यावर बोलायला काही सुचलं नाही, म्हणून नाग्या चुप्प बसला. आता चिंधीनं त्याचं तोंड समोर धरलं. मग ती म्हणाली,

"आईक येड्या भगता! मी आता दुमऱ्या कुनाची नही. तुजीच. तुज्या घरात शिरली. कापली तरी भाएर निगायची नही. तू देवी माशीशी दावा घेतला. तू नानासा मानूस. भांडता भाडता पट्टदिशी मरून जाशील. तुझ्या जोडीला मी येनार. हा गगन ही धरती. हा दीस ही राती. तसा माजा येडा भगत आन् मी. आता काय इन्चारू नको. मीपर सागनार नही!"

पुन्हा एकदा त्याच्या ओटावर तिन ओट टेकले. एका अनोख्या मधाच्या घडयात तो बुड्न गेला.

नाग्याला धरून चिंधी वाडीत शिरली त्या वेळी दारू खाऊन कुणी बडबडत होता. त्याच्याकडे लक्ष न देता माणम पाय पसरून झोपडयासमोर बसली होती. पोरं अंगणातच झोपी गेली होती. खोकत असलेल्या सुंभ्यानं पुसलं,

"कोन?"

चिंधीनं उत्तर दिलं,

"मी!"

यापरतं काही न बोलता ती नाग्याला घेऊन झोपडीजवळ पोचली. नाग्या तिथं थबकून म्हणाला,

"आयशी—"

"मी करीत्ये—"

आयशो झोपडीच्या दारात हात कपाळावर ठेवून बसली होती. या दोघांना पाहताच ती भडकली. म्हणाली,

"चंडालनी, कुटं नेल्ता माजा बाला?"

शब्द न बोलता चिंधी झोपडीत शिरली. तिनं नाग्याला अंथरुणावर झोपवलं. मग ती अगोदर बसली होती, त्या कुडाशी बसून राहिली. आयशी नाग्याजवळ गेली. दोन्ही हात कमरेवर ठेवून तिनं विचारलं,

"ही घूस घरात शिरना तुला पसंत हाये?"

नाग्या काही न बोलता चुपचाप पडून राहिला. थोडा वेळ आयशी तशीच उभी राहिली. चुलीत फाटी पेटली होती. त्यांचा उजेड चिंधीवर पडत होता. मग हात खाली सोडून आयशी म्हणाली,

"खायचा नही ?"

नाग्या मुकाट्यानं उठून थाळीपाशी बसला. घरात तेवढीच ती काशाची थाळी. आयशीनं रांधलेला राळ्याचा भात तीत वाढला. त्यावर हुलग्याचं पाणी. नाग्यानं हे थोरले घास पटापट गिळले. पाणी प्याला. थाळीत हात धुऊन ते पाणी पिऊन टाकलं. मग पुन्हा उठून झोपला.

आयशी उकिडवीच गुडघ्यावरल्या हातांवर हनवटी ठेवून बसून राहिली. मग तिनं म्हटलं.

"ए नवशे ! घरात तसा घुमायचा नही !"

चिंधीनं मान हलवली.

"तुज्या बापसाला बलावून घेऊन ये."

चिंधीन पुन्हा मान हलवून नाही म्हटलं.

"आत्ता काय करू ! मंग काय अशीच लांडोर मोरामागां फिरनार ?"

चिंधी म्हणाली,

"ऊं हूं !"

"मंग ?"

"पाट लावायचा !"

"हत् तुजा मढा ग्येला ! माजा बाला कोवला माडा — त्याच्याशी पाट लावीती गधी ?"

चिंधी तशीच बसून राहिली. थोड्या वेळानं आयशी म्हणाली,

"तशीच उपाशी मरशील माज्या दारी ?"

तरी चिंधी हलली नाही.

"हत् तुजा मढा ग्येला ! ऊट ! गील मडकाभर भात !"

चिंधी उठली. नाग्याची थाळी तिनं विसळली. तीत आयशीनं भात अन् हुलग्याचं पाणी वाढलं. ते जेवून तिनं थाळी घासली. ठेवून दिली. मग कुडापाशी हात उशाशी घेऊन अंग मुरकुटून झोपली.

आयशीनं गोधडं अंथरलं. म्हणाली,

"ए—तुजा मुडदा ग्येला—तिथं नको झोपू! हित ये!"

आयशीनं गोधडीवर अंग टाकलं. चिंधी तिथून उठली. आयशीजवळ झोपली. थोड्या वेळानं तिनं आपला हात आयशीच्या अंगावर टाकला. आयशीला वाटलं, तो ढकलून द्यावा. पण मग तिनं तो राहू दिला.

चिंधी काय आली, घरी एक वाघीणच आली.

अशी खपू लागली, अशी खपू लागली! पहाटे उठून रानात जायची. दिवस कासराभर चढतो तवर लाकडाची टोणकी आणून दारात टाकायची. कुऱ्हाड घेऊन भिडली, की पाहता पाहता टोणक्याच्या चिंध्या उडायच्या. मग असा भक्कमभक्कम भारा बांधायची, की सगळी ठाकरवाडी तोंडात बोट घालायची. कमरेला कोयती अडकवून, डुईवर मोळी ठेवून ती पेठेला निघायची. मागोमाग बारकी मोळी उचलून आयशी. चिंधी दडादडा चालायची. धरती जशी कापून उठायची. मूठभर खुर्दा आयशीच्या पदरात बांधून ती परतायची.

आयशी म्हणायची,

"अगो हडली, हल् चाल!"

पण आयशी सुखावली, हे नाकारण्यात मतलब नाही. घरी आली, की चिंधी डुईवर तीन घागरी घेऊन झऱ्यावर जायची. झपाट्यानं टेप चढून घरी परतायची. मग चुलीत गोवरीची खांडं खुपसायची. मातीच्या तावणीत पाण्याचं आधण तापवायची. त्यात निंबाचा पाला घालायची.

नाग्याला आंघुळीच्या दगडावर बसवायची. निंबाच्या पाण्यानं आंघूळ घालायची. मग धडपा घेऊन अंग पुसून काढायची. वणावर घोरपडीची चरबी लावायची. आठदहा दिसात नाग्याची कळा बदलत चालली. तो बोलायचा नाही. हे सगळं सुरू असताना तो चिंधीकडे पाहात असायचा. एखादे वेळी आयशी झोपडीत नाही असं पाहून ती नाग्याजवळ यायची. बसायची. तो तिच्या अंगावर हात टाकायचा. तो उचलून त्यानं ती आपल्या डोळ्यातली बाहेर न फुटलेली आसवं पुसायची, अन् त्याच्या कपाळावर ओठ टेकून लगेच तिथून उठायची.

भुत्या अन् नाग्याचे मैतर चिंधीचं वागणं पाहून सुखावले. एकदा भुत्या नाग्याकडे यायला निघाला. झोपडीजवळ आला, तो त्याला कुपाटीच्या सापटीतून ही दोघं जवळ दिसली. कुतूहल अनावर झाल. तो हळूच कुपाटीला भिडला. त्याला दिसलं, की नाग्या चिंधीचा हात धरून ओढतो आहे. ती तो निकरानं बाजूस सारत्ये आहे. पुटपुटत्ये आहे,

" अजून नही ! पाट लागल्यावर सगला तुजाच ! "

भुत्या थरकापला. त्यानं ठरवल, की आता आपण पुढ होऊन हे सगळं केलं पाहिजे. दोचौ दिसा आमावस्या होती. सध्याकाळी तो अंगणात येऊन आयशीला हाक मारून म्हणाला,

" काय करीती ? "

तिनं उत्तर दिल,

" ये रे बाला ! "

" तून ये भाएर ! "

ती बाहेर आली.

" काय म्हनीतो ? "

" बस ये ! "

आयशी बसल्यावर त्यानं हलक्या स्वरात पुसल,

" घरात घेतली, आता हाड भाजून का टाकीत नही ढोलियाची ? "

" तिला का इच्यारीत नही ? "

" दो चौ दिसा अमोशा ! "

" हाक का मारीत नही ? "

भुत्या दाराशी गेला. त्यान हाक मारली,

" चिंधी ! "

तिनं कान देऊन सगळ ऐकल होत. ती दारातून डोकावली. म्हणाली,

" आताच नही ! "

अचंब्यात पडून भुत्या म्हणाला,

" मंग कधी ? "

" नाग्या बरा हुईल. धट्टमुट्ट हुईल. घाई कशाची ? "

जाणत्या आयशीनं सुटकेचा उसासा सोडला. ती भुत्याला म्हणाली,

“ तिचा आईक. ती करील तो होऊ द्ये !
नाग्यानं रुसून चिंधीकडे पाहिलं, अन् तोंड फिरवून झोपून राहिला.

चांगली मोठया कासेची, दोन वेतं झालेली बकरी विकत आणून चिंधीनं दारात बांधली, तेव्हा आयशीनं अचंब्यानं विचारलं,

“ आपल्या घरी तर हुत्या ! ”

“ का करायच्या ? दुदानी तर जीभही भिजेना का ओठ ओला हुईना ! ”

“ नी हिचा दुद मडका भरून निघल तो ? ”

“ आमू दे सासबाय ! नाग्या पील. मादा हाये, तो बरा हुईल ! ”

कोंबडयांची अंडी निघत, ती आयशी फिरस्त्या अंडीवाल्याला विकी. तेवढेच चार दोन आणे मीठमिरचीत भर. चिंधीनं कोंबडीवर लक्ष ठेवलं. ती अस्वस्थ होताच चिंधी तिच्या मागावर राहिली. तुटक्या डालग्यात अंडं देऊन कोंबडी बाहेर पडताच तिनं ते उचलून आणल. चुलीवर तवा टाकला. इवला तेलाचा थेंब. अंडं फोडून त्यावर ओतल. पोळी होताच काविलथ्यान उचलली, अन मिठाबरोबर थाळीत घालून नाग्यासमोर ठेवली. त्याला झोपेचा झपका लागला होता. तटकन् जागा होऊन तो म्हणाला,

“ काय ? ”

“ उठ. खाऊन घ्ये. ”

“ काय ? ”

“ अंडयाची पोळी. ”

“ बाबो ! मी अंडा खात नही ! ”

“ का ? ”

“ बांम्हन खात नाही ! ”

हसून चिंधी म्हणाली,

“ येड्या, तू काय बांम्हून हुतो का ? ”

“ पुन्येवंत – ” उदास होऊन नाग्यानं म्हटलं.

चिंधी त्याच्याजवळ बसली. त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाली,

" बांम्हून पुन्येवंत हुतो, त्याची रीत येगली. आपली रीत येगली. सुर्यांचा चाल्ना येगला. चांदन्याचा येगला. चांदनीचा येगला. गिऱ्याचा येगला. समदा येक कसा आसल ? "

" पर बांम्हुनानी सांगितला—"

" आंडी खाऊ नही असा सांगितला—"

" नही, तसा नही—"

" मंग खा ! धट्टमुट्ट कसा हुशील ? तू बरा होत नाहीस तवर—" मग ती काही बोलली नाही. नुसतं हसून तिनं तोंड फिरवलं. नाग्यानं तरी शंका काढलीच—

" पर आयशी इक्रीती अंडी– "

" मी सांगील तिला. तू खा ! "

बामण होऊ घातलेल्या नाग्यानं तोंड वाकडं करीत अंड्याची पोळी खाऊन टाकली. मग जिभलीनं ओठ चाटून पुसून घेतले.

फाटी विकून येरवाळीच परतली, अन् दोरी घेऊन चिंधी डोंगरावर निघाली. आयशीनं विचारलं,

" जाती कुठं ? "

" बकरीसाठी पालाटाला– "

ती पाय उचलून निघाली. आयशी कुरकुरली,

" जसा भुत लागला हिला. "

नाग्यानं हे ऐकलंन्, तसा तो हसला. आयशी म्हणाली,

" का र हसतो ? "

नाग्यानं लाजून समोर शिटत असलेल्या कोंबडीला म्हटलंन्,

" अगे हाडं ! "

खलाटीतली सगळी झाडं बकऱ्यांसाठी पाला नेऊ नेऊ ओकीबोकी करून टाकली होती. मग चिंधी डोंगुराला लागली. ती लपाल्पा डोंगूर चढून गेली. समोर महादेवाचा बुधला उभा. तिल वाटलं, की नीट महादेव पाहिला नाही. कधी

पोळी निरखली नाहीत पुरतेपणी. मग ती उगवत्या अंगाला निघाली. पलीकडल्या सोंडेवर जाऊन उभी राहिली.

पाहू लागली, तर ओहोहो! किती किती पोळीं आहेत! काही माश्यांनी भरलेली. काही मोकळी टाकलेली. नुसता पांढरा मेणाचा पापुद्रा. काही मोडून गेलेली. काही जोडपोळी.

अन् ही सगळी किती उंचावर! मान ताटकळते. तिथपर्यंत कोण पोचू शकेल? कसा? केवढा बेलाग कडा आहे! महादेवाचं ते नाकाड. ते कपाळ. नाकाच्या खाली हा आत गेलेला पोकळ भाग. खपाटीस गेलेलं पोट असावं, तसा. हे भकल कसं चढून जायचं? शिडी कशी पोचेल तिथवर? अन् ती करायची कशाची?

छे छे! हे तर कल्पनेतसुद्धा येत नाही. अन् नाग्या बसला आण घालून. आपण त्याला सबूद दिला आहे. बरोबर राहीन म्हणालो आहोत. तुझ्या मागोमाग मी. तुझा पाय तिथं माझा पाय. तुझी उडी तिथं माझी उडी. कसं व्हायचं हे!

चिंधी कपाळावर हात देऊन बसून राहिली. बराच वेळपर्यंत. शेवटी ऊन्ह पार कललं. मग ती उठली. काही झाडांच्या फादोऱ्या खापलल्या. भारा बांधला. दरादरा उतरू लागली, तो तिच्या कानी ढोलाचा थरारा कोसळला!

तिच्या अंगावर काटा चमकून गेला. ही थाप दुसऱ्या कुणाचीही नव्हे. आपल्या ढोलियाची. क्षणभर तिनं भारा एका खडकाच्या टोकावर ठेवून दिला. त्याला टेकून उभी राहिली. डोळे मिटून घेतलेन. ढोलावर सुक्षम नकसकाम उमटू लागलं. हिचं अंगअंग फुलू लागलं. काटा उठला. श्वास कमीअधिक होऊ लागला.

तिनं भोवताली पाहिलं. आब्याचं एक झाड दिसलं. ती ल्पकन त्याच्याजवळ पोचली. कोयतीनं सातआठ टाळे काढले. ते भाऱ्यात खोचले. भारा घेऊन निघाली. तिची पावलं स्थिर पडत नव्हती.

झोपडीत शिरताच तिनं पाहिलंन्, एक डोळा फुटलेला नाग्या ढोल घेऊन बसला आहे. धडका डोळा त्यानं मिटून घेतला आहे. डाव्या हातातलं कांडकं अलगद ढोलावर पडतं आहे. उजव्या हाताची जाड जाड बोटं पुडावर नाचताहेत. नाजुक. जणू फुलांचा सडा पडतो आहे. चांदण्या बरसताहेत. भवताली पोरं

बसली आहेत. ती नागवी उघडी पोरं जादू घातल्यासारखी गप्प आहेत.

दारावर तोरण बांधण्यासाठी चिंधीनं आंब्याचे टाळे हाती घेतले होते. पण मग तिला वाटलं, की थोड्या वेळानं बांधू ! पुनव वारंवार थोडीच चांदणं शिंपते !

अवसेच्या राती अंगणात टेंभे जळत होते. माणसं दाटीवाटीनं बसली होती. भुत्या नाग्याला ढोसून म्हणत होता,

" ए म्हताऱ्या बाइलेच्या न्हवऱ्या, कुनीकडं पघतो ? "

लाजून लाजून चूर झालेला नाग्या पुटपुटत होता,

" कुनीकडं पघतो ? "

खोकला दाबीत सुंभानं म्हटलं,

" म्हतारी त म्हतारी ! आपल्या आपल्या नशिबानं घ्यावी ! कामाला कशी दांड ! जशी वाघीन ! "

हरखूनं सुंभाच्या मांडीवर चापट मारीत चिडवलं,

" या म्हाताऱ्याच्या मनात भरली जनू ! "

यावर विरक्त होऊन सुंभानं म्हटलं,

" माज्या मनात भरून उपेग काय ? तिच्या हिरद्यात त डोलाफुटका भगत बसला जाऊन ! "

भुत्यानं मैतरांकडे डोळा मिचकावीत म्हटलं,

" म्हताऱ्या, आजून पसंत आसल् त सांग. धा जनं तिला समजावू. वरीस दोन वरीस सुंभ्याचं आउशीदपानी कर. हाताला धरून वढयावर न्हेत जा आंगुलीसाठी. म्हतारा काई दोन वरीसांपरीस जास्ती जगायचा नही. तवर ढोलिया बसल् ढोल बडवीत ! "

आयशी गागली,

" ए पोरांनू ! आता कार उगा उशीर करीता ? "

" आमी कुटं उशीर क्येला ? न्हवरीच त आजून आली नही ! "

चारसहा जणींनी नवं नेसलेल्या चिंधीला हाती धरून झोपडीतून बाहेर आणलं. तिच्या हाती ताटली होती. तीत कणकेचा दिवा. तो थरथरत होता.

त्यांनी तिला नाग्यापुढं उभं केलं. लाजून ती पुटपुटली,

"मी नही जा!"

एक धिटुकली म्हणाली,

"अगं सवती, ववालती का मी ववालू? मग बस हात चोलीत!"

चिंधीनं नाग्याला ओवाळलंन्. त्याच्या डोक्यावर हळदीत भिजवलेले ज्वारीचे दाणे उधळलंन्. मग ती फडक्याचा काठ तोंडात धरून पुटपुटली,

"आता वो काय करायचा?"

मैत्रिणी म्हणाल्या,

"आता घरात जाऊन सैपाक करायचा. दनकून जेवायचा. न्हवऱ्याला उपाशी ठेवायचा. खालीवर घोगडी घालून झोपायचा. न्हवरा आल्यावर उठायचा नाय!"

त्यांना चापीत सुभान सांगितलं,

"बाय गे, थोर थोर मान्साना ववाल."

चिंधीनं अवघ्या वडिलांना ओवाळलंन. मग तिच्या मैत्रिणी तिला नाग्यापुढं घेऊन गेल्या. भुत्यानं नाग्याला उभं केलंन्. त्यानं तिच्या गळ्यात मंगलसूत बांधलन्. एकमेकांची कपाळं एकमेकांना टेकवली. मैत्रिणी सगळ्या हसू लागल्या. चिंधीनं एकीच्या छातीत तोंड लपवलंन्. तिला नाग्याच्या अंगावर लोटीत सजणी म्हणाली,

"आता का लाजती? तो तुजा न्हवरा तिकडे!"

सुभाला घाई झाली होती. तो उतावळा होऊन म्हणाला,

"झाला ना सगळा? आता आना मडकी! दुरोन येऊ द्या."

भुत्या खेकसला,

"म्हताऱ्या, तू बस दारू खात. आमी अदुगर नाचनार!"

एकानं ढोल आणून नाग्यापुढं ठेवला. नाग्यानं कांडकं हाती घेतलं. ढोल खणाणू लागला--

बांग् बांग् बाग् बांग्—

तांबडं फुटेस्तवर नाच झाला. गड्यांनी चाळ उतरले. टेंभे विझले. आयशीनं अंथरुण घालून ठेवलं होतं. ती म्हणाली,

"झोपा आता!"

नाग्या घाम पुशीत झोपडीत आला. कुडाशी उभी राहून किती वेळापासून चिंधी त्याची वाट पाहात होती. तो सारखा गती बदलीत होता. नाचिये गाणी म्हणत होते. गत बदलताच वेगळं वेगळं नाचत होते. त्यांचं गाणं संपत नव्हतं. नाचणं संपत नव्हतं. नाग्याचं वाजवणं संपत नव्हतं. चिंधी आपल्याशीच कुरकुरत होती,

"असा येडा भरतार पाहिला नही!"

आत येऊन नाग्यानं चिंधीला पाहिलन्. क्षणभर तो उभा राहिला. दुसऱ्या क्षणी तिचा हात धरून म्हणाला,

"चाल!"

अवघडून नजरेनं अंथरुण दाखवीत चिंधी म्हणाली,

"कुटं चलतो?"

"तू चाल!"

चिंधी निघाली. नाग्यानं झोपडीबाहेर पाऊल घातलन्. चिंधी पुटपुटली,

"कुटं नेतो?"

पण ती त्याच्या मागं चालू लागली. पुरतं दिसू लागलं नव्हतं, तो काल रात्री पाट लागलेली ती नवरात्रायकू महादेवाच्या बुधल्याची चढण चढू लागली.

नुकती एकटदुकट पाखरं बोलू लागली होती. सगळ्या रानावर धुईचं एक हलकं आवरण अंथरलं होतं. उंच झाडांचे शेंडे त्या धुईमधून वर डोकावत होते. अस जणू देवाच्या पायगती धुवट वस्त्र अंथरलं होतं. त्यावर वेळूंच्या उंचावलेल्या तुऱ्यांचं दर्भासन. त्यावर मांडी घालून महादेव बसला होता. कधी-काळीचा. त्याचं ध्यान चाललं होतं. उन्हाळे आले, पावसकाळे गेले. झाडांची पानं थरथरवीत नाचत मुरडत थंडी आली. लाजरीसारखी हळूच कोमावून नाहीशी झाली. किती चादण्यानं नहालेल्या राती. किती गडद काळोख्या अमोशा. किती दरदरती उन्हं. असं कायकाय नि कायकाय झालं. महादेवानं आपलं ध्यान मोडलं नाही. कधी कंचित तो दवळ्या बैलावर बसून राहाळ हिंडायला निघायचा, तेवढं सोडलं, तर त्याचं आसन भंगलं नाही.

डोंगुऱ्या महादेव, त्याचं डोंगुरवाणं रूप. भलं प्रचण्ड. त्याच्यावर उगवतीकडलं तांबडं पडलं होतं. ते काळं सावळं रूप उजळू लागलं होतं. तळातली वाट अजून अंधारलेलीच होती, अन् त्या वाटेवरून दोघं धावत होती. नाग्या अन् चिंधी. एकमेकांचे हात धरून. दवानं ओली झालेली चिंधी कापऱ्या स्वरात म्हणत होती,

" हळू चाल रे ढोलिया ! "

पण ढोलिया ऐकत नव्हता. मधूनच ती त्याला घट्ट धरून ठेवीत होती. तो तिच्या तावडीतून सुटून पुढं निघत होता. शेवटी सोंडेवरल्या टेपावर ती दोघं चढली, तेव्हा नाग्या थांबला. बोटान महादेव दाखवून तो बोलला,

" तो पघ ! देव ! "

त्याच्यामागं उभी राहून त्याच्या खांद्यावर हनुवटी टेकीत चिंधी म्हणाली,

" पघितला ! "

" तो वर उत्र पध त्याचा कपाल. ती वर शेंडी. ते डोले. तो नाक. तो गला– "

" पघितला ! "

नाग्याचं बोट थरथरू लागलं. तो कापऱ्या सुरात म्हणाला,

" अनी ती त्याच्या गल्यातली पोल्याची माल ! ती खालचा मोट्टी पोली. त्यात देवीमाशी ऱ्हाती ! "

" पघितली ! "

चिंधीच्या बकुटीला हात घालून नाग्यान तिला समोर ओढलन्. आपल्या तोंडाकडे बोट दाखवीत तो म्हणाला,

" पघ आता माजा कसा इद्रस केला तिनं ! तिचा हुकूम झाल्याबिगर माशी चावायची नही. तसा तिचा सांगावाच हाये समद्या राहाळाला ! "

त्याचं तोंड आपल्या छातीत लपवीत स्फुंदत चिंधी म्हणाली,

" आग लागलो तिच्या तोंडाला ! माजा सोन्यासारखा ढोलिया इद्रूप करून टाकला ! "

तोंड बाहेर काढीत नाग्या थरारून म्हणाला,

" व्हय व्हय ! आग लावायची ! त्या पोल्याखाली लाकडाची रास करायची. लई उच्च. मंग ती पेटवून द्यायची ! देवी माशी हितून हल्ली पायजे ! पलाली पायजे ठानं सोडून ! "

पुन्हा त्याला जवळ घेत चिंधी बोलली,

"माज्या बाला, पोला तर लई उच्च रे! तितवर तुजी आग पोचायची कशी?"

उंची अजमावीत नाग्या शंकित होऊन बोलला,

"असा?"

"आनी तुजी होली पेटली, तर सगला जंगल जलल का राहील? ठाकुरवाड्या पेटतील धडाधडा! मंग कसा?"

खचलेल्या नाग्यानं स्वर खालावून म्हटलं,

"हा हा! पेटतील धडाधडा!"

"मग?"

"मंग?"

"मंग?"

"मंग?"

चिंधीनं नाग्याला कवेत घेत म्हटलं,

"येडा! नुसता मंग मंग करीतो! मंग तुजा डोका! राती काय झाला?"

"काय?"

"क्याय्? पाट लागला."

"व्हय्! मंग?"

"मंग रातसर काय केलास?"

"का बा? ढोल वाजिवला!"

"येडा म्हन्ते तो काय खोटा नाय. बरा, नाच थांबल्यावर काय केला?"

"काय?"

चिंधी हसत सुटली. धूमधूम हसली. नाग्या आश्चर्यानं तिच्याकडे पाहू लागला. ती हसू थांबवून म्हणाली,

"आयशी काय म्हंगाली?"

"काय?"

"माजा हा ढोलिया निसता खुला हाये. काय पर समजत नही! मला हिकडे घिऊन आला. देव दावायला. देवीमाशीचा पोला दावायला!"

नाग्या पुन्हा उमसून म्हणाला,

" काय पर केला पायजे देवीमाशीचा ! "
" करू रे करू ! तुजे नाचिये नहीत का ? त्यांना पुसलास ? "
" नही ! "
" मंग घरी ग्येल्यावर त्यांना पूस. त्यांच्या मदतीनं करू काय पर ! बरा ? "
" हा हा ! "
मग समोरच्या झाडावर चिमणीनं चिमण्याच्या चोचीत चोच घातली.

रात्री भुल्याच्या अंगणात सगळे जमले होते. अंग धुवायच्या धोंडीवर आयशी बसली होती. निंबाच्या झाडाला टेकून चिंधी उभी होती. पहिल्या रात्री उभी होती तशी. अंगणात शेकोटी धगधगत होती.

भुल्यानं मान हलवीत म्हटलं,

" नही नही ! हा जमायचा नही. दुसरा काय पर सांग ! " मग तो आयशीकडे वळून म्हणाला,

" भगतनी, आइकलास तुज्या पोराचा आक्रीत ? "

कंदरावून ती बोलली,

" तो मना काय समजत नही ! हवा तो करा ! "

" अंग, हवा तो कसा करा ? महाद्येव या राहालाचा द्येव—खरा ? "

" हा हा ! "

" त्याच्या गल्यात आग्यामाश्यांची पोली—खरा ? "

" हा हा ! "

" मदला मोटा पोला तो देवीमाशीचा—खरा ? "

" हा हा ! "

" तुजा नवा भगत बोलतो, तो पेटवून दियाचा ! आता काय करू तो तू सांग ! "

चिडून चिंधी पुढं सरली. म्हणाली,

" भुल्याभाव, तू खरा खरा बोल. तुंमचा ढोलिया कुनाच्या अध्यात ? "

" नही ! "

" कुनाच्या मध्यात ? "

" नही ! "

" कंदी खोटाखरकटा बोलना ? "

" नही ! "

" गंगची धारा तमा वागना ? "

" हा हा ! "

" तरी त्याला माश्यांनी फोडला ? "

उसळून भुत्या म्हणाला,

" देवानी मारला, तो साह्यला पायजे ! "

" वाईट वकटा केला नही, तरी मारनार, असा कसा हा देव ? देव कसला ? हा तर खईस ! "

बाई आहे की हडळ ? खुशाल देवाला खवीस म्हणते ! अशानं सगळे देव कोपले म्हणजे ? वाडीचा इस्कोट होईल की राहील ? ही तर उद्या वाडीला आग घालायलाही कमी करायची नाही. जी धडधडीत देवाला शिवी देते, ती वडीलकीचा मान काय ठेवील ? आजपर्यंत वाडीत कायबाय झालं. कुणी पोट पाडलं. कुणी वाढवलं. क्वचित कधी दारू खाऊन माराठोकीही झाली. कुणी पळून गेली. कुणी नान्देनाशी झाली. हे नेहमीचंच आहे. नाही एखादीला आवडत सासर. मग ती घरी परतली. मारठोक करूनही गेली नाही. हे काना-आड करायचं असतं. त्यामुळं काही कुणी वाडीला कधी उणंदुणं म्हटलं नाही.

पण देवाला शिव्या ? म्हणजे तर कहर झाला ! हे जगावेगळं घडलं.

सगळेच पुढं सरले. कातावून कातावून बोलू लागले. कुणाचं कुणाला कळेना झालं. क्षणभर चिंधी गांगरली. पण मग तीही सावरली. उंच स्वरात बोलू लागली. ' हाहा, नही 'चा सगळा कालवा झाला. नाग्या मात्र मुकाट्यानं बसून राहिला. ओठ दातांखाली दडपून.

थरथरत सुंभा उठला. काठीच्या नेटानं तो उभा राहिला. हात उचलीत त्यानं म्हटलं,

" आइका रे ! आरडू नका ! "

हळू हळू कालवा विझला. पण कोऱ्या चुनखडीवर पाणी टाकावं, तसं खदखदणं सुरू राहिलं. सुंभा शहाणपणाचं बोलला,

"का रे बा, वाडीला भगत हवा! खरा?"

हळू आवाजात गडी बोलले,

"हा हा!"

"ढोलिया हवा—खरा?"

"हा हा!"

"अना ढोलिया मिलियाचा नही—खरा?"

"हा हा!"

"घुंगरासाठी दोरी—खरा?"

"खरा!"

"कोयत्यासाठी मूट—खरा?"

"खरा!"

"मोरामागा लाङ्गूर—खरा?"

"खरा!"

"त मंग ढोलियासाठी चिंधी—खरा?"

"खरा रे खरा! पर हा असा कामाचा नही!"

"तो भगत बगून घील. तो त्याचा काय करू! वाडीचा सबंध नही—"

"नही नही!"

सगळे एकदम उठले. शेवटचा निकाल झाला. भराभरा चालू लागले. नाग्यानं मान खाली घातली होती. चिंधीनं तरातरा त्याच्याजवळ जाऊन त्याचा हात धरला. म्हणाली,

"चाल!"

नाग्या उठला, अन् तिच्यामागं मुकाट्यानं चालू लागला.

चिंधी आयशीबरोबर मोळी घेऊन गेली, अन् नाग्या बाहेर पडला. उद्ध्वस्त मनानं तो डोंगराची वाट चढू लागला.

काही खरं नाही. भगतगिरीसाठी वाडीला नाग्या हवा. ढोल वाजवतो म्हणून नाग्या हवा. एरवी त्याच्याशी काही सबंध नाही. एवढं देवीमाशीचं त्याचं

वैर पडलं, ते त्याचा तो बघून घेवो ! कुणी कुणाचं नाही. ठीक आहे. आजपासून नाचात ढोल वाजवणं बंद ! पक्की गोष्ट. ही गोष्ट तुटायची नाही. अगदी निरगाठ !

हारवल्या मनानं नाग्या डोंगूर चढू लागला. त्याचे पाय पडतील ती वाट. वाटेत झुडुपंझाडपं आडवी आली. ती तो कोयतीनं तोडू लागला. पण चित्त ठिकाण्यावर नाही. कुणीकडे तरी डोंगर तुडवीत जायच आहे.

तो बुधल्याच्या लेण्याकडल्या अंगान आडवा निघाला. एका ठिकाणीं कडा कोमळला होता. भल्या थोरल्या दगडींचा ढासळ खालपर्यंत पसरला होता. एक पाय या दगडावर. एक पाय त्या धोड्यावर. क्वचित कुण्या धारेवर खरचटतंय. पण खरचटण्याच भान नाही. खन्तीत नाग्या पार बुडून गेला.

मधे एक जागी कारवी अन् घाणेरीच गचपण माजलं होतं. खाली वाकून जाळ्यातून वाट काढीत त्यान ते ओलांडल. वेल आडवे आले, ते कोयतीन तोडून टाकले. कमळाच जाळं दाटलेल्या तळ्यात पटाइतान पोहायला पडावं, अन पाहता पाहता अडथळे बाजूला सारीत पैल पोचावं. तसं नाग्याच झालं. पाण्यातल्या बदकासारखा सहज तो जाळ्यामधून वाट काढीत पुढं निघाला. डोकं मात्र ठिकाणावर नव्हतं. ते वईवई हिंडत होतं.

बुधल्याच्या पोटाखालच्या लेण्याजवळ तो क्षणभर थाबला. उद्वास मनानं पुन्हा चालू लागला. तसाच धारेधारेनं. बुधल्याला फेरा घालीत. पुढं वाट अवघड होती. कडा तुटलेला होता. तिथं हात टेकीत तोल साभाळीत तो पार झाला. बुधल्याच्या दक्षिणेकडे पोचला. या अंगाला झाडोरा बुधल्याशी अगदी भिडला होता. तो अतिशय दाट होता. कशाकशाची झाडं होती. जाभळीची अन् कुंभ्याची. हिरडीची अन् पिंपुर्णीची. त्यावर वानर बसली होती. नाग्याचा वास लागताच त्यांनी नापसर्तीदाखल कचाकचा दात वाजविले. पण तो तसाच पुढं सरतोय, हे पाहून भुभुःकार करीत ती या शेंड्यावरून त्या शेंड्यावर झेपा टाकीत खालच्या घळीत नाहीशी झाली—

काय ते मधमाश्या ?

हो. एका कड्यालगतच्या पिंपुर्णीवर एक नाजुकसं पोळं लोंबत होतं. मात्र ते आग्यामाश्याचं नव्हतं. बारक्या मधमाश्यांचं. ते पाहताच नाग्या भानावर आला. निरखून निरखून त्याकडे पाहू लागला.

एका बारक्या फांदीवर पोळं लटकलेलं होतं. भुरक्या ताबूस रंगाचं. माश्या लांबून लांबून येत होत्या. थोडा वेळ बाहेर थांबून अलगद पोळ्यावर बसत होत्या. मग त्या हळूच छिद्रांमध्ये शिरत होत्या. छिद्रातल्या माश्या ढुंगणाकडून बाहेर निघून क्षणभर आपले पंख साफ करीत होत्या. मग त्या उडून जात होत्या. असा सारखा त्यांचा उद्योग चालला होता.

पोळं मोठं मुबक होतं. अस बसक्या गाडग्याएवढं. काना नव्हता की कोपरा नव्हता. दो अंगांनी ते गोल होतं. किंचित लांबत. माश्याच्या येण्याजाण्यानं ते जिवंत झाल होतं.

त्या इवल्या इवल्या मेहेनती माश्यांच ते घर होत. त्या रानभर हिंडून मध आणीत होत्या. कुठून कुठून. कसला कमला. हिरडीचा अन् कारवीचा. मोहाचा अन् घाणेरीचा. बेहड्याचा अन कुडयाचा. तो पोळ्याच्या वरच्या भागात असलेल्या काद्यात साठवीत होत्या सारखे त्याचे परिश्रम चालले होते. उसंत नव्हती. जणू कुणी त्याना रोजान घातल होतं.

नाग्या अलगद पिंपुर्णीवर चढला. पोळ चार सहा हातावर राहिलं. तिथून तो पोळ्याकडे निरखून पाहू लागला. सारखी धादल सुरू होती. कुणाला क्षणाचीही फुरसत नव्हती.

नाग्याला मोठं आश्चर्य वाटल. त्यान चारदहादा पोळी काढली होती. चुडीत पेटवून खाली धरायच. मधमाश्या कदरावून निघून जातात. खालचा भाग तोडून टाकून खायचा. काटा तेवढा मुठीत धरून ताब्यात पिळायचा. गोळा राहील तो मेण म्हणून वापरण्यासाठी घरी न्यायचा. बोटं चाटून टाकायची. कधी ताब्यातला मध नागलीच्या भाकरीसंग खायचा. जास्त गोळा झाला, तर वर फडकं बांधून पेठेत विकायला घेऊन जायचा. एवढाच ठाकराचा अन् पोळ्यांचा संबंध.

पण जो जो नाग्या जवळून न्हाहाळू लागला, तो तो त्याला मोठं आश्चर्य वाटल. अचंब्यानं त्याच मन अगदी भरून गेल. या माश्या इतकी धावाधाव का करतात ? कोण याना कामाला धाडत ? पोळ्यावर कुणाची मालकी ? कोण मजुरी देत ? अन् या गप्पा टप्पा करायला का थाबत नाहीत ?

माणस पायांवर पाय टाकून गोष्टी सागत बसतात. तासन तास. विडया फुंकीत. सूर काढकाढून ती कधीकाळीच्या कथा आटवून आठवून सागतात. दोघं बसली

की तिसरं तिथं खिळतं. चौथं चिकटतं. अशी गप्पांची आंडी घालीत माणसं प्रहरच्या प्रहर एका जागी बसतात.

माश्या का बसत नाहीत? की त्यांना थकवा येत नाही? त्यांचे हातपाय दुखत नाहीत? की कधी त्यांना दुखणंबाणं होत नाही?

तो मोठा अचंबा करीत राहिला. तों त्याला दिसलं, की फांदीवर हळू हळू एक सरडा पुढं सरतो आहे. आता हा सरडा पोळ्याजवळ कशासाठी येतो आहे? मध खाण्यासाठी? की गंमत पाहण्यासाठी? आपल्यासारखं त्याच्याही मनीं पोळ्याविषयी कौतुक दाटलं आहे?

सरड्याचा वेग कमी होत होत थांबला. पोळ्यापासून हाता दीड हातावर. तिथं तो निचळ, चौ पायांवर चिकटून बसला. जणू त्याला झोप लागली आहे. सरडा नाहीच तो. एक दगड आहे. किंवा फांदीचाच एक भाग आहे.

माश्या बुजणं बंद झालं. त्या त्याच्या अंगावरून पलीकडे जाऊ लागल्या. असं सगळं निवांत झालं. नुसती सरड्याच्या डोळ्याची उघडझाप तेवढी सुरू होती. दिसे न दिसे अशी.

एक माशी पोळ्यावरून उडाली. सरड्याच्या जवळ आली. क्षणभर ती घोटाळली. पण मग ती निर्धास्त मनानं सरड्याजवळ पोचली.

विजेसारखी सरड्याची जीभ बाहेर धावली, अन् माशीला वेटाळून पुन्हा तोंडात गडप झाली!

अरे चण्डाळा! यासाठी बसला होता काय तू टप धरून?

नाग्या रागेजला. तो खाली उतरला. एक काटूक उचलून पुन्हा वर चढला, अन् त्यानं ते सरड्याच्या पोटाखाली घालून त्याला ताड्दिशी उडवून दिलं. सरडा खालच्या खडकावर आपटला, अन् तरतरत खबदाडीत निघून गेला. नाग्यानं म्हटलं,

"मुर्दाडा, ये त खरी पुन्हा! तोडीतोच तुजा मुंडका!"

पुन्हा तो फांदीवर तसाच अवघडून पोळ्याचं कौतुक करीत राहिला. पाय दुखेपर्यंत. शेवटी पायांना कळ लागली, तेव्हा तो खाली उतरला, अन् पुन्हा पुन्हा पोळ्याकडे पाहात उगवतीकडे चालला.

चालता चालता तो थबकला. कसं झालं हे? आपला तर मधमाश्यावर लोभ जडला!

छे छे ! मधमाश्या आपल्या दावेदार. आग्या असोत की गावरान असोत. यांच्याच भाईबंद त्या. त्यांनी आपलं अंग फोडून काढलं. डोळा कामातून गेला. त्यांचा आपला उभा दावा. अन् मग या ल्हानग्या पोळ्यावर प्रीत काय करून बसलो आपण ?

नाग्याला वणव्यात सापडल्यामारखं झालं. झाडोऱ्यातून तो बाहेर पडला. उघड्यावर आला. पाठीशी महादेव होता. आकाशावेरी पोचलेला. डाव्या हाताच्या कोपऱ्यात खाली दूर आपटं होतं. आकाशात दिवस पेटत होता. खाली नाग्या जळत होता.

एका धोंड्यावर बसला तो. पायातळीचे खडे वेचून उगीच ल्वणात भिरकावू लागला. पुन्हा जखम वाहू लागली. आपलं काय चुकलं ? माश्यांनी आपल्याला का फोडावं ? मक्याच्या ओळींमधून तण शोधून काढावं, तसं त्यानं आपलं सगळं वागणं विंचरलं. ममोर मांडलं. शोधशोधून पाहिलं. काही कुठं चूक दिसेना.

एकदम त्याला धक्का बसला. की कुणी देवीमाशी आहे हेच खोटं ? बा नं उगीच आपल्याला थाप मारली ? तेवढ्या त्या थापेवर भरवसून आपण त्या महादेवाच्या गळ्याखालच्या पोळ्याशी वैर घेतो आहोत ? अगदी भयाभया झालं. पार वेड लागायची पाळी आली. वर ऊन्ह तापत होतं. खाली नाग्या भाजून निघत होता.

ताडकन तो उठला, अन् तरातरा चालत महादेवाच्या तोंडासमोर जाऊन उभा राहिला. वर पाहिलन्, तर महादेव आपला डोळे मिटून ध्यानात मगन झालेला !

चिडून नाग्या म्हणाला,

" देवा रे, तुजी मज्जा !

डोळा निरका करायला नको, का उघडून बगाया नको ! कुनी कुनाला फोडून खावू, का काना करू !

तुला ठावा नही का रे ? त्या दिशीं मी तुज्या पाया पडला हुता. मंग तुज्या कवतिकाच्या देवीमाशीला नमिस्कार केला हुता. असा सगल्यावरून ववालून गेला हुता. काय कुनाचा ठिवला नही !

तरी तुज्या देखतडोला माशांनी मला फोडला !

तू बी खोटा, तुजी देवीमाशीबी लबाड !

कशाला र बसला ध्येन धरून ? इकडे जग करू काय तरी ! येकमेकाचा गला कापू, का रघात पिऊ ! छातीवर पाय देऊ का खापलून काढू ! तुजा ध्येन काय भंगायचा नही ! "

नाग्या असा मनानं रिकामा झाला. भकास. मग महादेवाकडे पाहात दोन्ही हात डोक्यावर ठेवून उभा राहिला. किती वेळ ते त्याचं त्यालाच कळलं नाही. बोटं तशीच एकमेकांत गुंतलेली. बुधल्याच्या ढोलीतून राहणाऱ्या घारी त्याच्यावरून झेपावून पलीकडे निघून गेल्या. किती पारवे उडाले. किती सातभाई. नाग्या तसाच खुंटासारखा उभा.

मांजावलं. मन भरकटलेला नाग्या पाय घाशीत डोगूर उतरून वाडीकडे चालला. डोंगुराच्या पोटाखालून कुणा ठाकरान हाका घातल्या. त्या लांबवर दुमदुमल्या. नाग्यानं ऐकल्याच नाहीत. उतार उतरून तो खलाटीत पोचला. वाट सोडून कुणीकडे तरी चालत राहिला. बाध चढत आणि उतरत.

दचदिशी तो थांबला. हबका बसावा तसा. भगुल्या डुईवर मडकं घेऊन येत होता. पळसाच्या पानानी झाकून. त्यानं थाबून विचारलं,

" नांग्या ? "

" वो ! "

" कुनीकडं रे हिंडतो ? "

" कुनीकडं नही ! "

" इकून कुनीकून आला ? "

हात बावऱ्यासारखा कुठंतरी वेळावून नाग्यानं म्हटलं,

" इकून ! "

मडक्यावरून वाहणारा वारा गपकन नाग्याच्या नाकात शिरला. उग्र भपकाऱ्यानं त्याचं डोकं उठलं, पण एकदम त्याचं मन चमकल. दारू ! त्यानं भगुल्याला पुसलं,

" दारू हये का ? "

" हा हा ! "

मग क्षणभर नाग्या काही बोल्ला नाही. दुसऱ्या क्षणीं त्यान उन्मळून विचारलं,

" लई कडक ? "

" हा हा ! लई कडक ! पेतो का ? "

थरथरत नाग्यान म्हटल,

" दे ! "

लहानपणी बानं क्वचित कधी कौतुकान एखादा घोट पाजला होता, त्यापलीकडे नाग्याच्या जिभेला दारू लागली नव्हती. ती खारट आंबट जळजळीत आग पोटात ढकलण त्याला मजर नव्हतं. पुण्यवन्त होण्याचा छंद घेतल्यापासून तर त्यान दारूला स्पर्श केला नव्हता. तो सोवळा बाम्हून झाला होता

हे त्याच जगावेगळ वाडीत कुणालाच आवडत नव्हत. भगत असल्यामुळं विचार करायचा नाही, इतकच. एरवी हे काय बान्याबाम्हुनाच्या जातीच येड-खुळ वागण ? दारू पिण हा तर ठाकराचा धर्मच आहे. अम धर्मावेगळं कधी कुणी केल नाही. ढोलिया आहे, बोलायच नाही, तो भाग वेगळा.

असा तो जातीवेगळा पडू लागलेला नाग्या पुन्हा सुतावर आलेला पाहून भगुल्याला फार बर वाटल. त्यान त्याला वाटेच्या कडेला दण्डाला धरून नेलं, म्हणाला,

" बस ! "

मंत्रचळल्यासारखा नाग्या भुइ टेकून बसला. गुडघे छातीशी घेऊन. भगुल्यानं येकळीचा काटा आणला. तो टोचून पळसाच्या पानाचा द्रोण बनवला. मग तो नाग्याच्या हाती देऊन म्हणाला,

" धर ! "

नाग्यान दोन्ही हातानी द्रोण धरला. मडक्यान नीट धार धरून भगुल्यान त्यात दारू ओतली. म्हणाला, " पे ! "

एकदा नाग्याच सगळ अंग शहारून निघाल. पण त्यान डोळे घट्ट मिटले, अन गप्पदिशी द्रोण तोंडात ओतला. ती जळजळीत आग गालफडाच्या कुप्प्यात साठली. घशाखाली उतरेना झाली. गालाचा आतला भाग झणाणला. घशाच नलिकायत्र उघडेच ना !

शेवटी नाग्यान जोर केला. आतडी भाजीत ते उष्ण रसायन पोटात पोचलं.

मार्ग मोकळा झाला. सगळं अंग गदागदा हलवीत नाग्यानं द्रोण अपघाती समोर धरला. भगुल्याला वाटलं, याला आणखी हवी आहे. त्यानं म्हटलं,

"नीट धर!"

आपल्या हातानं द्रोण धरीत त्यानं मडक्याची धार त्यात ओतली. मग तो नाग्याच्या ओठाशी लावला. अजाणता नाग्यानं तो पिऊन टाकला. आपण काय करतो ते त्याला उमगलंच नाही. दोन द्रोण पोटात पोचताच एकदम त्याला बरं वाटलं. फार फार बरं वाटलं. भगुल्यानं विचारलं,

"आखीन् पितो का?"

मुकाट्यानं नाग्यानं द्रोण समोर धरला. भगुल्यानं तो भरताच नाग्यानं तोंडात रिचवला. एकटा नाग्या पितोय, अन् आपण नुसतेच त्याला पाजीत आहोत, हे भगुल्याला बरं वाटेना. तो म्हणाला,

"थांब्नास का! मी दूरोन करीतो मजसाठी."

भगुल्यानं एक द्रोण आपल्यासाठी केला. बेभान झालेला नाग्या अन् भगुल्या, दोघेही दारू पीत राहिले. द्रोणांमागं द्रोण. पिकलेला भगुल्या. नवथर नाग्या. शेवटी भगुल्याच म्हणाला,

"आता पुरं!"

अडखळत नाग्यानं म्हटलं,

"आखीन् का देत नही?"

"नही नही! चल उठ!"

"नही? नही तर नही! मी इथच झोपतो!"

"आर नही झोपियाचा! घरी चल!"

"घरी? मला उचलून घेशील?"

"हा हा! चल!"

एकमेकांच्या अंगावर कोसळत, एकमेकांना धरीत ते वाडीकडे निघाले. वाटेनं नाग्या अफाट बडबडत होता. झोकांड्या खात होता. छातीवर हात मारीत होता. देवीमाशीचे पंख तोडीत होता. आभाळाला हात लावीत होता. चांदण्या पाडीत होता. चंद्राला धरून आसडीत होता.

ते दोघे बडबडत वाडीत शिरले. दारुड्यांचं बडबडणं वाडीला इतकं सवईचं झालं होतं, की कुणी ढुंकून तिकडे पाहिलं नाही. जशी नाग्याची झोपडी जवळ

येऊ लागली, तसा नाग्या गडबडला. तो मागं झेपावत म्हणाला,

"मी नही येत–"

भगुल्यानं छातीवर हात मारीत म्हटलं,

"चिंधीला भितो? अरे मी हाये ना! तुझ्यावाटचा मार मी खाईन. मी चढीन फासावर! तू चल!"

जेमतेम झोपडीजवळ पोचला, अन् नाग्याला भडभड उलटी झाली. सगळं अंगण भरून गेलं.

चिंधी आयशीबरोबर घरी आली, तेव्हा तिला उमगलं, की दिवसभर न खातापिता नाग्या जंगलात अन् डोंगुरात भटकतो आहे. धास्तावून तिनं चौकशी केली. तिला कळलं की ती पेठेत जायला निघाली अन् पाठोपाठ नाग्या बाहेर पडला. ती थोडीशी हबकली. आयशीला म्हणाली,

"जाऊं का पघायला?"

"कशाला जाती? यील, जातो कुठं?"

"पर जेवला नही खावला नही–"

"खाल्ली असतील फलामुला–"

जसजसं अंधारून येऊं लागलं, तसतसा तिचा जीव खालवर होऊ लागला. ती दाराशी येऊन उभी राहिली. कुणाचंही पाऊल वाजलं, की ती डोळे फाड-फाडून निकडं पाहू लागली. शेवटी माचाणाच्या आडून झेपावत दोघे अंधारात पुढं आले. तिनं नाग्याला ओळखलं. खंतावून पुढं झाली, तो नाग्या भडभडा ओकला!

धावत जाऊन तिनं त्याला धरलं. तो हात हालवीत म्हणू लागला,

"भगुल्या मडका घेऊन येत हुता, तव्हा मी पियाला. नही तर पियाला नसता!"

भगुल्या त्याला समजावू लागला,

"भितो का बिस्या! मी चढन फासावर! घेऊं दे मला फाशी!"

डोळ्यातून निखारे फेकीत चिंधीनं नाग्याला त्याच्या हातून सोडवलन्. झोपडीत घेऊन आली. त्याच्या झोकांड्या जात होत्या. आयशी कपाळावर हात

देत म्हणाली,

"आत्ता काय करू रे माज्या बाळा !"

घोगडी अंथरून चिंधीनं नाग्याला झोपवलंन्. कुठून आंब्याची आंबोशी आणलीन. ती पाण्यात खंगाळून नाग्याला पाजलीन्. तो काही बोलू गेला. चिडून म्हणाली,

"आता चिप पड ! बोलशील तर मारीन !"

तोंड लपवून नाग्या गुपचुप झोपला खरा, पण काही वेळपर्यंत त्याला वाटत राहिल, की आकाश अन् घर हे दोन गरगरा फिरणारे तंबू आहेत. पेठेत भरलेल्या जत्रेत पाहिलेल्या फिरत्या तंबूसारखे. त्या तंबूखाली लाकडी घोड्यावर बसल्या बसल्या कधीतरी तो अंधारात बुडाला.

पहाटे नाग्या जागा झाला, तेव्हा त्याला जाणवलं, की शेजारी झोपलेल्या चिंधीचा हात आपल्या अंगावर आहे. एकदम त्याला कालचं तारांगण आठवलं. आपण केलेलं आक्रीत आठवलं. त्याची त्याला इतकी लाज वाटली, की त्यानं तो हात अलगत बाजूला केला, अन् अंथरुणाच्या एका कोपऱ्यात लहान मुलासारखा गुडघे पोटाशी घेऊन पहुडला.

चिंधी तेवढ्यान जागी झाली. ती हात लांबवून चाचपडू लागली. नाग्या तिला गावताच त्याचं बकुट धरून तिन त्याला पोटाशी ओढलंन्. तो तिला दूर लोटू लागला. शेवटी ती फुसफुसली,

"सासबाय झोपली दाराशी–"

तेवढ्या स्वरान आयशी जागी झाली. म्हणाली,

"कोन गे तो ?"

चिंधीन उत्तर दिल,

"कुनी नही–मामूजी !"

उत्तर दिलन् अन् तिन नाग्याला अळंबळं ओढीत त्याच तोंड आपल्या बाजूला वळवलन्. काही वेळ ती दोघं फुसफुसत राहिली. मग भान विसरून मोठ्यान बोलू लागली.

" काल ईळभर होतास कुठी ? "
" डोंगुरावर. "
" काय करीत हुता ? "
" काही नही–"
" यड्यावानी हिंडत हुता ? "
" हा हा ! "
" जेवला खावला नही ? "
" नही–"
" कोठंकोठं गेला ? "
" पांडवाच्या खोल्याकडून असा ऽ ऽ ! "
" लिंगोबाला वळसा देऊन ? "
" हा हा ! "
" महादेवासमोर गेला ? "
" हा हा ! "
" पोळा पघितला ? "
" हा हा ! "
थोडा वेळ चिंधी गप राहिली. मग तिनं विचारलन्,
" त्याचा मुडदा ग्येला—भगुल्या कुठं गावला ? "
नाग्यानं लाजेमुळं उत्तर दिलं नाही. चिमटा काढून ती म्हणाली,
" बोलन का नही ? "
" लाज वाटती–"
" पिताना नही वाटली ? सांगताखेपी लाज वाटती ? वा र तुजी लाज मीठ-मिरची ! आर, भगत ना तू ? "
नाग्यानं उत्तर दिलं नाही. त्याला डिवचून चिंधी म्हणाली,
" तोंडाचा भांडा वाजत का नही ? तू भगत ना ? "
" हा हा ! चिडवू नको–"
" चिडवावा म्हनून नवस बोलली होती का रे मी ? तू कंधी पीत नहीस ?
नाग्यानं उलटून विचारलं,
" तू ? तू नही का पियाली कंधी ? "

" मी गेली मसनात ! तू भगत. पुन्येवन्त. सांग. कंधी पीत नहीस ? "

" नही–"

" आता का पियाला र ? "

तिला पुन्हा दूर ढकलीत नाग्या बोलला,

" चुकला माजा—शेन खाल्ला—आता इच्यारू नको—"

" पुन्ना पिशील ? "

" नही पिनार ! "

" पक्का ? "

" पक्का ! "

" पिलास तर मंग मला काडी मोडून दे. मी दुसरा न्हवरा करीन. "

तिच्या कुशीत शिरत नाग्यानं म्हटलं,

" नही नही ! "

थोडा वेळ चिंधी त्याला थोपटीत राहिली. मग म्हणाली,

" बावरा झाला का रे ? कशापाई ? आर मी हाये ना ? आपुन उंद्या जाऊ. महादेवाच्या पाया पडू. त्याला गाऱ्हाना घालू. म्हनू का बाबा रे तुला आमची कालजी. काय करायचा तो तू कर. झाला तो झाला. आता वाटाड्या तूच हो ! कल्ला ? "

" हा हा ! "

लहान लेकरासारखं नाग्याला पोटाशी घेऊन चिंधीनं त्याच्या अंगावर घोंगडी घातलीन अन् ती पलीकडून नीट त्याच्या अंगाखाली शिरविलीन.

ती दोघं डोंगूर चढू लागली, तेव्हा आकाशात ढग आले होते. एरवीचं स्वच्छ आकाश ढगांमुळं एखाद्या फाटक्या गोधडीसारखं दिमत होतं. मधला भाग गर्द निळा. मग काळसर, राखिया, पांढुरका असा एकेक लांबकळणारा तुकडा. पाण्यावर रेघोट्या काढीत पाणकिडे हिंडावेत, तशा त्या एवढ्या थोरल्या आकाशात पाकोळ्या उडत होत्या.

एका झुडपाला गोजिरवाणी निळीजांभळी फुलं लागली होती. झुबाच्या झुबा.

नाग्यानं थांबून म्हटलं,

"चिंधी, फुलं घालीती का डोक्यात?"

"कुठं र फुलं?"

"ती काय?"

"मला नको. देवाला काढ."

नाग्या झुडपापाशी गेला, अन् त्यानं सगळा झुबका तोडून घेतला. आकाशात घिरट्या घालणाऱ्या पाकोळ्या खाली सूर मारून या दोघांच्या डोईवरून गेल्या. चिंधी म्हणाली,

"पानी येतो का?"

"कसा कळ्ळा तुला?"

"पाकोळ्या उडत्यात गंगनात!"

"हा हा!"

हिरडीबाहव्याखालून अन् करवंदीच्या जाळ्यांशेजारून ती दोघं उगवत्या अंगाला महादेवासमोर जाऊन उभी राहिली. तोच तो शेशंभर हात उंचीचा बुधला. त्यावर रेखलेलं उठावदार महादेवाचं ओबडधोबड मस्तक. एरवी ते रखरखीत दिसलं असतं. आता आकाशातल्या मळभामुळं सौम्य दिसू लागलं. मंदमऊ. पेठेत विठ्ठलाचं देऊळ होतं. तिथला विठ्ठल दोघांनीही पाहिला होता. काळाकळकळीत. कानांपर्यंत पोचलेले डोळे. साजिरं मुखमण्डळ. लांब सुरेख नाक. हसरा भाव. डुईवरली मोळी रावळासमोर टेकून तासतास त्याच्याकडे बघत उभं राहावंसं वाटे. पण तो वाऱ्याबाम्हनाचा देव. रावळातल्या त्या पांढऱ्या गुळगुळीत फरशीवर पाऊल घालतानाही लाज वाटायची.

हा आभाळाएवढा महादेव आज अगदी विठुब्बासारखाच दिसत होता. तसंच सोमाळं रूपडं. तसाच हासरा भाव. जणू तो जवळ बोलावतोय. त्याला काही सांगायचंय. काही हितगुज करायचंय. पाठ थोपटायची आहे. पोटाशी धरायचंय. आपल्या डुईवर हनुवटी टेकायची आहे. मग त्याचा श्वास आपल्या डुईवर कोसळेल. आपण त्याच्या छातीशी मिळून जाऊ. एकजीव होऊन जाऊ—

पण त्याच्या गळ्यातली ती पोळ्यांची माळ — ती देवीमाशी —

छे छे! देव आपल्याला फसवतोय. आपण दूरच राहिलं पाहिजे. तो देव, आपण भक्त. तो मोठा. आपण उलीसे. तरी त्याच्या तावडीत सापडता कामाचं

नाही.

त्याला म्हणू की आरे महादेवा! आरे दऱ्याडोंगरांच्या राजा! तू उंच आहेस, तो तसाच राहा. आभाळाएवढा आहेस, तो तसाच राहा. सगळ्या रानावनावर तुझी नजर, ती तशीच राहू दे. ती हलू देऊ नकोस. ढळू देऊ नकोस. सगळ्या राहाळातल्या वाड्यांवर तुझा लोभ, तो तसाच राहू दे.

उली उली पिलं आयांच्या कुशी फाडून बाहेर येतात. खेळतात. मोठी होतात. त्यांची लगीनं होतात. मग बीपेरणी होते. मग पुनः आयांच्या कुशी थोराबनात. तंवर ही पहिली म्हातारी होतात. एका दिवशी हळूच सास थांबतो. डोळे बघेनासे होतात. हात हालेनासे होतात. पाय चालेनासे होतात. सगळंच निचळ होतं.

मग माणसं त्यांना उचलतात. काळ्या धरतीदेवीत खड्डा करतात. त्यांना आत ठेवून देतात. वरून मूठमूट माती लोटतात. धरतीदेवी त्यांना आपल्या पोटाशी धरते अन् गुपचुप निजवते. त्यांनी पुनः उठायचं नसतं. धावायचं नसतं. त्यांच्यांतल्या जिवाचा नवा जलम होतो.

हे सगळं उघड्या आभाळाखाली चाललेलं तू पाहतोस रे माहादेवा! तुझी नंदर चहूकडे पाहात असते. तुझे डोळे उगवत्या अंगाला असले, तरी तुला चहू दिशांचं दिसत असतं. पुढचं तसं मागचं. उजवीकडलं, डावीकडलं. कोणती एक गोष्ट काही तुझ्या नंदरेतून सुटत नाही.

तर मग नाग्याला देवीमाशीच्या परजेनं फोडलं, हेही त्वां बघितलं आहेस. नाग्याचा अपराध नसताना फोडलं आहे. नाग्या भगत आहे. साधा सरळ माणूस. धरममार्गानं चालणारा. तरी त्याचा असा डंख काढला. तेव्हा आता त्याचं अन् देवीमाशीचं भांडण पडलं. काय हुईल ते जाईल. देवीमाशी तरी तुझ्या गळ्याखालून उठेल, नाग्याचं तरी कायबाय हुईल. आता मागं सरणं नाही! ही आण तुझ्या देखत वाहिली.

तेव्हा तू असा जवळ बोलावू नकोस, लटका लोभ लावू नकोस. उगीच फसगत करू नकोस. तू देवच राहा. नाग्याला इवलासा भगतच राहू दे. एव्हाच असा आपल्यात मिसळून घेऊ नकोस!

महादेवाच्या त्या लोभसवाण्या रूपाकडे पाहात नाग्या अन् चिंधी बराच वेळ उभी राहिली. हरवून जाऊन. दिवस कलू लागला. मग चिंधीनं एक उसासा सोडला. म्हणाली,

" मांगतला काय मागायचा तो ? "

भानावर येऊन नाग्या म्हणाला,

" नाय बा ! "

हसून चिंधी बोलली,

" येड्या, निस्ताच पघत राहिला ? माग की ! "

नाग्याला वाटलं, चिंधीचही खरं आहे. मग त्या दोघांनी महादेवासमोर पाच दहा वेळा डोकं टेकलं. चिंधी म्हणाली,

" साग की काय बाय ! "

" काय मागू ? सुमत नही ! "

" मला पर सुमत नही. पर द्येवाला सगला कलला. "

" मंग आता काय करायचा ? "

त्याला उत्तर न देता चिंधी बुधल्याकडे निघाली. अगदी त्याच्या तळाजवळ. प्रचण्ड भिंतीसारखा कडा जिथं खाली पोचला होता, तिथून वाटेपर्यंत दगडाळ उतार होता. काटवणानं भरलेला. काही येकळी. काही करवंदी. काही चिलाटी. त्या काटवणातून ती दोघं अगदी बुधल्याच्या पोटाशी पोचली. तिथून वर जवळ जवळ पाऊणशे हात वरपर्यंत ओबडधोबड भिंत उभी होती. त्या पाऊणशे हात अंतरात क्वचित, कुठं एखादं बारकं विवर. बाकी सगळा कडा बेलाग. चढून जायची मुळीच सोय नव्हती.

अन् तवढ्या त्या पाऊणशे हात उंचीवर प्रचण्ड पोळी लटकलेली होती. तपकिरी रंगाची. तितक्या खालूनही त्या पोळ्यावर माशा घोंघावत असलेल्या दिसत होत्या.

चकित नजरेनं त्या पोळ्यांकडे बघत चिंधीनं विचारलं,

" देवीमाशी कुंच्या पोळ्यात ऱ्हाती ? "

" काय की बाबा. कुंच्या तरी पोळ्यात असल ! "
" भाएर निंगत नही ? "
" रातींची कधीबधी निंगती. "
" आता ? "
" आता कशी निंगल ? आता बसली आसल चुलीपाशीं ! "
" हा हा ! चुलीपाशीं बसली आसल ! "
" पर पोळं कंचं ते तर तुला ठावं नही ! "
" नही नही ! "
" मंग कंचं पोळं उडवायाचं ? "

थोडा वेळ नाग्या अगदी गोंधळून गेला. या इतक्या जवळून अशी पोळी त्यानं कधीच निरखली नव्हती. लांबून नुसती खालची पोळी दिसत होती. ही थोरलाली. त्यातल्या मधल्या पोळ्यात देवीमाशी राहते, असं बानं सांगितलं होतं. पण इथं तर चार दोन पोळी होती. जवळजवळ सारख्याच तोलामोलाची. कुठल्या पोळ्यात राहात असेल बरं ती जरीमरी ?

पण थोडया वेळानं त्याचा विचार पक्का झाला. एशा भले ! सगळीच काढायची. कुठल्या का पोळ्यात असेना, सगळीच पोळी हाकलल्यावर आपच जाईल थोबाड काळं करून. एवीतेवी वैर पडलंच आहे. मग एका पोळ्याशेजारचं दुसरं हुमकलं, तर काही फारसं बिघडत नाही.

तो म्हणाला,

" सगळीच धिऊ उडवून ! "

पण कशी ? हे तर आकाशाला झोंबणं होतं. पोळ्यांकडे पाहता पाहता पागुटं पडत होतं. मान ताटकळत होती. एवढ्या उंचावरची पोळी काढायची कशी ? म्हणालो होतो खरं की खाली जाळ करू म्हणून. पण जाळ एवढ्या उंचावर पोचणार कसा ? धग फार झालं तर दहावीस हात उंचीवर पोचेल. फारच मोठा जाळ केला तर दोन विसा हात. पण ही पोळी तर त्याच्या दुप्पट उंचीवर आहेत. ढीमसुद्धा व्हायचं नाही. खाली जाळ पेटव्, वर माश्या मजेत शेकत बसतील. गप्पा हाणीत.

पोळ्यांपर्यंत पोचावं कसं ! छे छे ! अक्कल चालेनाशी झाली. मती अगदी गुंग झाली. तंवर लांब कुठं गडगड्ड लागलं.

बराच वेळ ती दोघं डोक्यावर हात देऊन उभी राहिली.

नाग्या हिरमुसून म्हणाला,

" देवानं तर काहीच सांगितलं नही – "

एकदम चिंधी चमकली. थरारली. नाग्याला धरून ती म्हणाली,

" सांगतोय् पघ ! "

" कुठं ? "

" आयकू येत नही ? "

" हा हा ! पर त्ये तर आभाळाचं गडगडनं ! "

" येड्या, देवाचा आवाज असाच उच्च असतो ! असा कसा रे तू भगत ? "

नाग्या लाजला. हे बेटं ध्यानीच आलं नव्हतं. देव असा उंच स्वरात बोलत असला पाहिजे.

दोघंही लक्ष लावून ऐकू लागली. गडगडाट हळू हळू सुरू होई, मग एकदम तो मोठा होई, अन मग हळूहळू मावळे. ढोल थरारतो तसा. तसेच परण.

चिंधी म्हणाली,

" आइकलं का ? "

" हा हा ! "

" उमगलं का ? "

भरवसा येऊन नाग्यान म्हटलं,

" उमगलं ! देवाच बोलनं— येकदम कसं उमगलं ? "

" मंग आता ? "

" देवाला परदेशिना घालून चल ! "

" पावस ? "

" येऊ आला तर. "

ती दोघं काटवणातून खाली उतरून बुधल्याला उजवी घालीत निघाली. चिंतनात बुडालेला नाग्या. वळून वळून पोळ्यांकडे पाहात चाललेली चिंधी. बुधला उजवीकडे ठेवीत ती दक्षिणेकडल्या झाडावळीत शिरली. एकदम नाग्याचा दण्ड धरून चिंधी म्हणाली,

" नाग्या रे ! "

" काय ? "

" तो बग —"

एका आईनाच्या ठेंगण्या झाडाभवती अजगरानं विळखा घातला होता. चांगले दोन तीन वेढे. अंगावर चट्टेपट्टे. तेलिया पिवळसर रंग. विळख्यामुळं तो किती लांब आहे ते कळत नव्हतं.

कोयनीला हात घालीत नाग्या पुढं होऊ लागला, हे पाहून चिंधीनं त्याला मागून मिठी मारली. म्हणाली,

" जाऊं द्ये. "

नाग्या थबकला. त्याच्या खांद्यावर हनुवटी टेकून बारकाईनं पाहात चिंधी फुसफुसली,

" मेल्यानी खाल्लाय् काय तरी ! "

" हा हा ! "

थोडया वेळानं तिन नाग्याला ओढीत म्हटलं,

" चल ! "

मोकळवाणी वाट सांडून नाग्या कडयाच्या लगत निघाला. चिंधीन म्हटलं,

" कुनीकून ? "

" ये. "

" कशाला ? "

" पोळं दावीतो —"

" पोळं ? "

" दावीतो ये ! "

ती दोघं झाडोऱ्याच्या फांद्यांखालून वाट काढीत पिंपुर्णीपर्यंत पोचली, तंवर ढगांचा एक भला थोरला, लांबुकळा झुबका बुधल्यावर झुकला होता. पलीकडल्या डोंगरावर धारा उतरल्या होत्या. एकटदुकट थेंब झाडोऱ्याच्या छतावर वाजू लागला होता.

पिंपुर्णीच्या खालून नाग्यानं पोळं दावताच चिंधी हरिखली.

" किती लहानुसं ! "

" हा हा ! "

" मध हाये जनू ! "

" हा हा ! "

"काढीत का नही?"

तिचा हात धरून नाग्यानं तिला थोपवलं.

"का रे?"

"अम् दीनाम!"

चिंधीला उमगल, की ढोलियाचा पोळ्यावर लोभ जडला आहे. मग ती पिंपुर्णीच्या खोडावर रेलून पोळं निरखू लागली.

पाऊस उतरत असल्याचं माश्यांना जाणवलं होतं. त्या भराभरा पोळ्याभवती गोळा होऊ लागल्या होत्या. छिद्रात शिरत होत्या. सगळं पोळं माश्यांनी गजबजून गेलं होतं.

एकदम चिंधी म्हणाली,

"उलटा लिंगोबाचा डोंगूर!"

बरोबर! अगदी लिंगोबाचा डोंगूर उलटा टांगून ठेवावा, तस ते पोळं फांदीला टांगल होतं. चहूबाजूंनी माश्या भराभर येत होत्या. अलगत पोळ्यावर उतरत होत्या. चमत्कारून चिंधी म्हणाली,

"कुनाकडं जातात या माश्या?"

"काय ठावा?"

"वळखून पोळ्याकडे येतात कश्या?"

"काय ठावा?"

हे तर फारच आश्चर्य होतं. एवढुश्शी माशी. एवढा थोरला डोंगूर. त्यावर कुठं कुठं जाते. गेळ्यावर, हिरडीवर, जांभळीवर, करवंदीवर. चुटुचुटु मध चुपते. चुपते, अन् नेमकी पोळ्याकडे परतते. तिला रस्ता कोण दावतं? चुकत कशी नाही? नेमकं झाड कशी ओळखते? धुई वेटाळून आली की माणसाचीही दिशाभुली होते. उगवती मावळती कळत नाही. एवढं शहाण माणूस, पण तेही वाट चुकून कुठंतरी जातं. कुणीकडं तरी आदळतं. माशीच नेमकी पोळ्याच्या झाडावर कशी उतरते?

आग्यामाश्यांच एकापरतं ठीक आहे. त्याची पोळी अंतराळात तरी टांगलेली आहेत. एख्या घरात शिरली, अन् कुणी ओळखीच भेटलं नाही, तर पुन्हा आस्मानात उडता येतं. पुन्हा घर शोधता येतं. पण या लहानुश्श्या माशीचं नवल पाहा ना! केवढ्या गच्चपणात हे पोळं! पण नेमकं ते शोधीत

कशी येते कुणास कळे–

दर दर पाऊस उतरला. टपाटपा झाडावळ गळू लागली. पाणी फांद्यांवर उतरलं. तिथून ते खाली खोडांवरून धावू लागलं. चांगला झपाटेदार असा तो या सालाचा पहिलाच पाऊस होता. चिंधीचं अंग थरारलं. तिनं नाग्याच्या छातीत तोंड लपवलं. नाग्यानं विचारलं,

"काय झालं ?"

"काही नही !"

तिनं एकदा दृष्टि उचलून नाग्याकडे पाहिलंन अन् हसून पुन्हा त्याच्या छातीत लपली. नाग्या म्हणाला,

"मज्जा ?"

"मज्जा !"

पाऊस बळावला. चिंधीच्या झिंज्यातलं पाणी नाकातोंडावर गळू लागलं नाग्यानं विचारलं,

"पांडावाच्या लेण्यांत चलती का ?"

"चाल !"

मग ती दोघं एकमेकांचे हात धरून झाडोऱ्यातून पलीकडे निघून मावळतीकडे बुधल्याच्या पोटाखालून चालू लागली. पाऊस उगवतीकडून उतरत होता. त्यामुळं कड्याच्या पोटाशी फारशी जोराची झड कोसळत नव्हती. तुटलेल्या कड्याजवळून नीट कंगोरे धरून ती पलीकडे पोचली, अन् थोडक्याच वेळात टाकी ओलांडून लेण्यात शिरली.

कधीकाळी कुणीतरी लेण्यात भूस साठवलं होतं. त्याचा चुरा अजून लेण्याच्या भुईवर शिल्लक होता. कोपऱ्यामधून दगडधोंडे गोळा झाले होते. तोंडाजवळ पावसकाळ्यात गवत उगवत असे. आता ते वाळलं होतं. छपराच्या कोन्यात कुठं कोळ्यांची जाळी जमली होती. कुणी कधी लेण्यात काहीबाही शिजवलं होतं. त्या वेळच्या चुलीचे तीन धोंडे, अन् त्यांच्यामधली राख अजून तशीच होती.

आत येताच चिंधीनं लुगड्याचा पदर सोडला. नाग्याचं डोकं अन् अंग पुसून काढलं. मग आपलं पुशीत ती म्हणाली,

"कुनीकडे पघतो र ?"

“ कुनीकडे पघू ? ”

हासत चिंधी म्हणाली,

“ माझ्याकडे का पघत नही ? ”

गंभीरपणं नाग्या म्हणाला,

“ द्येवाचा बोलना–”

“ उकलला का ? ”

“ नही आजून ! ”

लेण्यात दगडी ओटा होता. नाग्या त्यावर बसला. शेजारी त्याच्या मांडीवर कोपर रोवून चिंधी. नाग्या बाहेर आकाशाकडे बघू लागला. उजवीकडून डावीपर्यंत पांढऱ्या ढगांचा एक पातळ थर होता. त्यांच्याखाली काळ्या ढगांचा दुसरा. मघा आकाश भरलेलं होतं. आता काही भाग रिता होऊ लागला.

अशा त्या नाग्याच्या तोंडाकडे चिंधी पाहात राहिली. मग त्याला चिमटा काढीत ती म्हणाली,

“ येडा बांम्हून ! ”

एकदम नाग्यानं तिचा दंड धरीत म्हटलं,

“ पघ ! ”

“ काय पघाया सांगतो ? ”


“ द्येवाच्या बोलन्याचा आरथ ! ”

त्यानं दाखवल्या दिशेकडे चिंधी बघू लागली.

लेण्याच्या तुटक्या छपरावरून एक कोळी धाग्यावरून उतरत होता.

नाग्यापाठोपाठ धावत चिंधी लेण्याच्या तोंडाशी जाऊन उभी राहिली. ती दोघं अगदी जवळून कोळ्याचं ते उतरणं निरखू लागली.

असा बारक्या चिंचोक्याएवढा कोळी. वरच्या खबदाडीत त्यानं धाग्याचं एक टोक गुंतवलं होतन, अन् आता दुसरं गुंतवण्यासाठी तो जागा शोधीत होता. लेण्याच्या तोंडाशी त्याला जाळं करायचं होतं. तेवढ्यासाठी तो वरून खाली उतरत होता.



चिंधीनं कोळ्याचं ते वरून खाली उतरणं बघितलन्, तरीही तिला उमगलं मात्र नाही. ती नाग्याकडे पाहू लागली. गोंधळून जाऊन. नाग्यानं डोळे मिटून मान हालवीत म्हटलन्,

" मी कोन ? "

" तू ? नाग्या ! "

" नही. "

" ढोलिया—"

" नही—"

" माजा न्हवरा—"

" नही—"

" मेल्या ! मंग वान्नेर ! "

" नही—"

" मला नही ठावा—"

" अगे, भगत—"

" हा हा ! "

" मला देवानी मंगाच्या गडगडन्याचा आरथ सांगितला. "

" तो कमा ? "

" खालून चढायचा नही, वरून पोल्यावर उतरायाचा—"

" आत्ता रे दावेदारा ! आर, पर कशाला धरून ? "

" देवाच्या शेंडीला दोर बांदून. "

नाग्याचा तो अर्थ ऐकताच चिंधी केवळ थरारली. ती नाग्याच्या पाठीशी उभी होती. तिथूनच तिनं त्याला धरून करकचून आवळलन्, अन् त्याच्या पाठीला चक्क चावली. नाग्या म्हणाला,

" माकडीन ! सोड ! तितं बसू चल ! "

दोघंही जाऊन ओट्यावर बसली. चिंधीनं विचारलं,

" सगला तो सांग बगू ! "

" अगे, देव म्हनीतो, तुला खालून वर चडता यायचा नाय. तवा तू वरून खाली उतर ! "

क्षणभर चिंधी गंभीर झाली. तिनं नाग्याच्या खांद्यावर हात ठेवीत

विचारलंन्,

"नांग्या!"

"वो!"

"आर, पर देवाच्या डोक्यावर चडायचा कसा? तो देव!"

"आपुन झाडदेवाच्या पाया पडून वर चडतो, तसा. खरा?"

"हाहा! खरा!"

पाठीला चावली होती, तिथं थुंकी लावीत चिंधीनं विचारलं,

"पर नांग्या!"

"काय?"

"आतापर्यंत कुनी वर चहडला नही–"

"नही–"

"देव रागवला तर?"

"नही रागवायचा–"

"पर रागावला तर?"

"नही नही–"

त्याच्या पाठीत तोंड लपवीत चिंधी कुजबुजली,

"वंस खंडला तर?"

जोरानं मान हालवीत निर्भयपणं नाग्या म्हणाला,

"नही नही! हा पक्का! पर हा कुनाला सांगायचा नही–"

त्याच्या मांडीत डोकं खुपसून चिंधी भ्याल्या हरणीसारखी झोपली. त्याचा हात घट्ट धरीत. तिच्या पाठीवर थोपटीत नाग्या म्हणाला,

"आपुन देवाची लेकरां—खरा?"

चिंधीनं नुसती मान हालवली.

"वाईटवकटा केला नही. खोटा कंदी बोलला नही. सगली पालनूक केली. देवाचा काही मोडला नही. आता तो तारू–तो मारू! त्यानं दावली, त्या वाटेनं जायचा! हा काम पक्का!"

पावसकाळा बोलून आला. ठाकरणी मीठमिरचीची सोय करून ठेवायला झटू लागल्या. पावस सुरू झाला म्हणजे धूम धूम कोसळणार होता. उसंत देणार नव्हता. झोपड्यांपुढली अंगणं शेवाळणार होती. ओल्यामध्ये चालून चालून पायांना चिखल्या होणार होत्या. चहूकडे सर्दावा दाटणार होता. त्या काळासाठी घरात सर्पण पाहिजे, अन् पावसकाळ्याचं पेठेत जायला व्हायचं नाही, तेव्हा मीठमिरचीही पाहिजे.

आगोट म्हणजे अन्नाचा अभाव. ठाकर पाखरांमागं धावू लागले. सशांसाठी जाळी टाकू लागले. काय मिळेल ते तिथल्या तिथं भाजून खाऊ लागले. घरात कुणी ठरेना झाला. पोरंही तिकाटण्यांना चीक लावून ती झाडांखाली मांडू लागली. आपण झुडपांमागं लपू लागली. तिकाटण्यावर पाखरू गुंतताच बाणासारखी त्यावर पडू लागली. त्याचे पंख उपटीत शिकार वाडीत आणू लागली.

ठाकरणी फाट्यांच्या मोळ्या घेऊन पेठेत पळू लागल्या. पोरीसोरी रानशेण्या गोळा करीत डोंगुरावर हिंडू लागल्या. दिवसभर वाडी मोकळी. हाडकुळी कुत्री घराघरातून शिरायची, अन काही सापडलं नाही, म्हणजे उगीचच भुंकायची. कोंबड्या उगीच किडामुंगी टिपीत प्रत्येक झोपडी शोधायच्या.

चिंधी आयशीबरोबर फाटी घेऊन जायची. येताना बकरीसाठी पालाटाला आणायची. तिथून परतली, की पाळंमुळं गोळा करीत डोंगूरभर हिंडायची. असा तिचा झपाटा.

नाग्या मात्र जो सकाळी प्याज पिऊन जायचा, तो कडुसं पडल्यावर परतायचा. आला की असेल तो घासभर भात गिळायचा, अन् ढोल काढून बसायचा. ढोलावरचे बोल ऐकले की रानात ठाकरांचे पाय थरथरू लागायचे. पण या दिवसात त्यांच्यात अवसानही नव्हतं, अन् अन्न शोधण्यापुढं नाचायला वेळही नव्हता.

एके दिवशी पोरं धावत धावत सुंभ्यापाशी आली. इतकी जोरानं, की त्यांना धाप लागली.

"सुंभ्यादा! सुंभ्यादा!"

पेंगत असलेल्या सुंभ्या धसकून जागा झाला. तो खेकसला,

"तुम्हांला वाहागानी खाल्ला! काय झाला रे?"

"आर नांग्या—भगत—"

"त्याला तरसानी खाल्ला—"

पोरं हसू लागली. इतकी हमली की पोटाना अगदी वळकच्या पडल्या. सुंभ्यानं शेजारी ठेवलेली काठी उचलून ती उगारीत म्हटलं,

"सांगता का—"

पोरांनी जे सांगितलं, त्याचा अर्थ हा, की बुधल्याच्या पलीकडे पक्क्या जंगलात मोहाचं आभाळात शिरलेलं झाड आहे. त्याला नाग्यानं कोंभाळ्याचा वेल बांधला आहे. अगदी वरच्या शेंड्याला. त्या दोराला धरून तो दिवसभर वर चढतो, अन् उतरतो! दुसरं काहीच करीत नाही!

आचीर! केवढं थोरल आचीर हे! दुसरं काहीच करीत नाही! नुसता चढतो उतरतो! अरे पण कशासाठी? छे छे! वर काहीतरी असेल. एखादं मधाचं पोळं. एरवी चढेल कशाला? उतरेल कशाला?

"नही र सुंभादा! दीसभर येंगतो आन् उतरतो! माकडावानी!"

आता आली का पीडा! बहुधा या पोराला भुतान धरलं असावं. काय करावं! कोवळा भगत. तरी त्याच्यावर भरवसून वाडी राहिली नव्हतीच म्हणा! तिनं शेजारच्या पाड्यावरल्या लुंब्या भगताकडे दुखणंभाणं दाखवणं सुरू केलं होतं. पण म्हणून काय झालं? शेवटी लुंबा भगत परका. नाग्या आपला माणूस. आज कोवळा असला तरी उद्या तो पक्का झालाच असता. तोच आता भुतानं झपाटला! करावं तरी काय!

ढासत ढासत सुंभा उठला. काठी टेकत टेकत भगताच्या झोपडीकडे चालला. त्याच्यामागं पोरांचा घोळका. ती सगळ्या वाडीत बातमी पेरीत चालली. म्हातारीकोतारी घरी होती, ती तोंडावर हात मारू लागली. 'आत्ता र बाबा' म्हणू लागली. घोळक्यात भर पडत चालली. सगळा काल्वा मातला. कुणाचं कुणाला कळेना झालं. त्या काल्व्यात काही थोडं होतं दुःख. काही थोडं होतं कुतूहल.

जो जो झोपडी जवळ येऊ लागली, तो तो सुंभाचं दुःख वाढत चाललं. थोरला भगत मेला. त्याचं हे एवढंच पोरगं. सुतावाणी सरळ. कुणाच्या अध्या-

मध्यात नाही. आता बाम्हनावानी वागायला धडपडायचं. पण त्यामुळं काही फारसा मोठा अपाव होत नव्हता. त्याला माश्यांनी फोडलं. पार एक डोळा फोडून टाकला. आता ते माश्यांचं करणं. त्यांच्या मागं काय काठी घेऊन धावता येतंय्? त्यांच्या करणीचा सूड देवमाशीवर काढायचं खूळ कसं शिरलं याच्या डोक्यात? बहुधा त्या देवचारानंच याला झपाटलं असलं पाहिजे! सुंभाला रडू आलं. तो आकाशात हात उंच करून हुंदकू लागला.

झोपडी मोकळी होती. नुसत्या कोंबड्या भुई टिपीत होत्या, अन् कुचकुचत इकडे तिकडे हिंडत होत्या. बकरीची कोकरं डोळे मिटून तोड चाल्वीत होती अन मधूनमधून नाजुक स्वरात बेंबटत होती.

लंगुटीला डोळे पुशीत सुंभा तिथंच बसून राहिला. पोरांनी वाट पाहिली पाहिली, अन् मग एकेक करून विखुरली. कुणी आलं म्हणजे भर्रदिशी गोळा होता येईल.

संध्याकाळी पुन्हा गडगडून पाऊस सपकला. पेठेल्या गेलेल्या आयशी अन् चिंधी भिजून परतल्या. डुयातलं पाणी हातांनी निरपीत. सुंभाला पाहून आयशी बोलली,

"का र सुंभाभावजी!"

कसं सुतोवाच करावं, तें सुंभाला कळेना झालं. शेवटी तो म्हणाला,

"तू काय कालजी करायची नही—आपुन लुंब्रा भगताला मवताला हितं आनू. दुमरा मोटा मोटा भगत गोला करू!"

तोंडावर हात ठेवीत आयशी आश्चर्यानं बोलली,

"आता ग माजी बाय! कशाला?"

"लिंगूबाची खोडी काढली, मंजी असाच हुयाचा. पर आपन ओखद करू!"

"कुनाला काय झाला?"

"नांग्या भगताला!"

हबका बसून आयशी एकदम खाली बसली. चिंधीनं अचंब्यानं विचारलं,

"त्याला का झाला?"

"भुत लागला त्याला—"

"का?"

"झाडावर चढतो उतरतो. चढतो उतरतो. चढतो उतरतो—"

तवर माणसांचा घोळका गोळा झाला होता. आयाबाया आत येऊन आयशीजवळ बसल्या. पोरं दाराशी उभी राहिली. सुंभानं त्यांची साक्ष काढली,

"सांगा र—"

लगेच कालवा करीत ती सरसावली. सुंभानं खाखावत म्हटलं,

"हत तुमच्या गेंडीला खरूज झाली! कुनी येक का सांगत नही?"

मग बाकी पोरांना कोपरानं ढोशीत एक पुढं सरसावलं, अन् त्यानं जे काय पाहिलं होतं ते सगळं सांगितलं. काहीएक शिल्लक न ठेवता. दुसऱ्या एका पोराचा थोडासा मतभेद झाला. पहिल्याचं म्हणणं की नाग्या वान्नेरासारखा दिसत होता. दुसऱ्याचं मत असं की तो मसण्या उदासारखा दिसत होता. या मतभेदामुळं पोरांमधे थोडकी मारामारी झाली. पण ती सुंभानं काठीच्या साहाय्यानं सोडवली.

आयशी तर पार रडवेली झाली. तिच्यावर पार आभाळ कोसळलं. एकुलतं एक पोर, तेही असं वानराउदासारखं झाडावर खेपा घालायला लागलं. तोंडाला फडका लावून तिनं हुंदका दाबला खरा, पण केविलवाणेपणं ती चिंधीकडे बघू लागली.

सुंभानं आपलं नाक शिकरलं, अन् मग तो म्हणाला,

"अगे, तू रडती कशाला? करू कायबाय! तुजा पोरगा–त्याला दुसरा कुनी नाई! पर आमी करू त्याचा बन्दोबस्त!"

एवढा वेळ चिंधी गप्प राहून ऐकत होती. पण आयशी मोठ्यानं गळा काढणार, हे पाहून ती पुढं सरसावून पोरांवर आरडली.

"पल्ता का नही रे!"

तिचं अवसान पाहून पोरं धांदरली. ती अंग सावरून उभी राहिली. फारच अंगावर आली, तर पळायची तयारी. एक डोळा आत, एक बाहेर. त्याच्या मदतीला उभा राहिला सुंभा. काठी जमिनीवर उभी धरून वर पाहात तो म्हणाला,

"त्यांच्यावर का गागती?"

त्याच्याकडे जणू लक्षच नाही अशा थाटात चिंधीनं आढ्याची एक शिपटी हाती घेतली. तेव्हा मात्र पोरांनी पाय बाहेर घेतला. लांब जाऊन ती पुन्हा जमून हसू लागली. चिंधी बाहेर डोकावीत म्हणाली,

"देऊ का एकेक सपाटा ?"

पोरांना माहीत होतं. चिंधी बोलते ते करते. ती काही सपाटे हाणता राहायची नाही. मग ती सगळी पांगली. आत वळून चिंधी करकरीत स्वरात सुंभाला म्हणाली,

"त्या दिशीं तूही त होता म्हाताऱ्या!"

तिचा स्वर ऐकताच सुंभानं गचका खाल्ला. हा स्वर काही खंतावल्याचा नव्हता. एवढं नाग्याला भूत लागलं पण त्याबद्दल जणू या बाईला काहीच वाटत नव्हतं. उलट तीच नखं बाहेर काढून विचारायला उभी राहिली होती. कंबर बांधून.

उकिडवा बसत हात भुवयांना लावून तिच्याकडे पाहात सुंभा म्हणाला,

"कुंच्या दिशीं ग बाये? मी त नाग्या जल्मला त्या दिशीही हुतो!"

बाण तर खच्चून मारला होता सुंभानं. पण तो तसाच पेलून चिंधी बोलली,

"त्या दिशीं! भुत्याच्या आगनात—"

"हा हा!"

"तो काय करूं–वाडीचा सबंद नही–कुनाचा बोल्ना हा?"

"कुनाचा?"

"तुजा नही? वाघोबाच्यान् सांगतो का?"

"हा हा! माजा! पुढा बोल!"

"पुढा काय पर नही. इक्ता काकुल्त करायचा नी गला काडायचा कारन नही. आमचा आमी बगून घेऊ!"

काय तिखटजाळ पोरटी आहे! चक्क सांगते आमचं आम्ही बघून घेऊ म्हणून! खरं पाहिलं, तर आयशीनं तिला दापायला पाहिजे. चांगली खुंदळायला पाहिजे. पण ती तर जणू तंबाखू खाऊन बसली! सुंभा उठला. म्हणाला,

"बरुबर हाये तुजा! लावलेल्या पंखाचा उडना असाच असतो. पर त्या पोराला सांबालायला हवा. तुजा काय! एक न्हवरा सोडून आली, हा दुसरा केला. हा खपल्यावर तिसरा!"

चिंधीच्या डोळ्यातून विस्तव धावला. पण मोठ्या ताकतीनं तिनं तो गिळून टाकला. तशीच उभी राहिली. मग सुंभाला वाटलं, आपलं चुकलं. फार वाहवलो आपण. एवढं बोलायला नको होतं. जरा जास्तीच झालं हे. मग तो घाईघाईनं

बाहेर पडत म्हणाला,

"कुनाचा करना अन् कुनाचा धरना!"

सुंभा गेल्यावर आयशी चिंधीकडे पाहात म्हणाली,

"कसा ग बाये हा? असा कसा हा बाला झाडावर येंगाया लागला?"

तिच्याजवळ बसून तिच्या खांद्यावर हात ठेवीत चिंधी बोलली,

"सासबाय, नाग्या तुजा पोट फोडून आला—खरा?"

"हा हा!"

"तर तुजा त्याच्यावर जीव. पर मी त्याच्यासाठी बापाचा घर सोडून आली—खरा?"

"हा हा!"

"तो बरा झाला नही, तवर तुज्याजवळ झोपली—खरा?"

"हा हा!"

"त्याच्यासाठी दोन गड्यांचा काम करती—खरा?"

"हा हा!"

"भाजा काय वाईट वकटा वागना—"

"नही—"

"कुनाकडे बगना—"

"नही—"

"मंग काय काळजी करू नको. नाग्याला काय पर झाला नही."

बाहेर पाऊस पडत होता. नाग्या निसूर झोपला होता. चिंधी त्याचे हातपाय चेपीत होती मधूनच त्याच्या तोंडाशी वळून म्हणत होती,

"बरा वाटतो?"

"हूं!"

"कंबरेवर पाय देऊं?"

"हूं!"

तो बाहेर चुडतं दिसली. भुत्याचा आवाज आला—

" धाकला भगत ! "

चिंधी पटदिशी नाग्याला ढोशीत म्हणाली,

" आला धरना ! "

नाग्या घोंगडीवर उठून बसला. भुत्याच्या पाठोपाठ चारसहा जण आत शिरले. नाग्याच्या उशाशी बसले. चिंधी पलीकडे कुडाशी उभी राहिली.

जांभई देत नाग्यानं म्हटलं,

" रातीचा ? "

चूड समोर धरून भुत्या म्हणाला,

" उगा ! "

त्यानं नीट निरखून पाहिलं. छे ! याच्या वागण्याबोलण्यात कसलाच गुंतवळ नव्हता. एकदा खुणवाखुणवी झाली. तू बोल तू बोल झालं. मग भुत्या म्हणाला,

" पाखरं धरना त तू सोडून दिला.—"

" हा हा ! "

" मंग ? ईळभर काय करीतो ? "

हात उडवीत नाग्या बोलला,

" करतो कायबाय ! "

जोर करून भुत्यानं पुसलं,

" झाडावर कशाला येंगतो ? "

नाग्यानं ठरवलं, एकदा बोलून टाकलं पाहिजे. खटका तुटला पाहिजे. म्हणजे पुन्हा पिरपिर नको. जांभई देत तो म्हणाला,

" भुत्यादा, तुमचा म्हन्ना असा, का मला भुतानी धरला – खरा ? "

" खरा ! "

" खोटा ! "

" खोटा ? "

" खोटा ! मला काय पर झाला नही. दीस कव्हा निंघतो ? "

" रात सरल्यावर. "

" आता निंगाया सांगितला – निंगल ? "

" नही ! "

हे अगदी योग्य होतं. भगतासारखं बोलणं होतं. सगळ्यांनी माना डोलवल्या.

रीतीचं बोल्तोय् नाग्या.

"नही निंगायचा. तसा माजा काम पक्का झाला नही अजून. झाला की सांगल्. उठा आता – मला पेंग आली."

झर झर झरून आकाश मोकळं होऊ लागलं.

नागपंचमीचा मण वाजत गाजत आला, अन् कडाडत निधून गेला.

ठाकरानी घरोघर पाट मांडून तांदळाचे नाग काढले. तांबडी फुलं वाहून त्यांची पुंजना केली.

हात जोडून म्हटलं—

नागोबा रे, तुज्या रानात राहतो. दिवसारात्री उघडया पायांनी हिंडतो. हवे तिथं. हवे तसं. तुला मामोरे येतो. ओलांडतो. तू आपल्या राज्यात मनमोकळा हिंडत असतोस, पण तुला आडवे येतो. तुझ्यावर आमचा पाय पडतो. शेपटी-वर. पाठावर. तोंडावर. असे नाना रीतींनी तुझे नाना अपराध करतो.

पण आम्ही लेकरं कुणाची ? तुझी. दयावन्त हो. अवसे पहाटेचा, रात्री वे-रात्रीचा, दिहा दिवसाचा, भरल्या दुपारचा, करकरीत तिन्ही सांजाचा, अमोशा पुनवेचा – असा आम्हाला सांभाळ !

त्या दिवशी कुणी एक नागवाला आला, अन् त्या दरिद्री ठाकरवाडीत हिंडून नाग दाखवून पायली दोन पायल्या नागलीवरी–कोदोकुटकी गोळा करून घेऊन गेला. म्हणे काय, की नागोबाला दुद द्या ! दुद काही मिळायच नव्हतं. गाउली माता. ती दुहायची नाही. बकरीची दुधं काढताक्षणी खळाळत्या चायच्या आधणात पडून संपून जायची. पण तो परतताना डुईवर दोन ओझी घेऊन गेला. नागाचा पेटारा, अन् धान्याचं गठुळं.

मग हळू हळू श्रावण सरत चालला. अमोशा आली. पोळ्याचा सण.

घरोघरी गाईची पुंजना. तादळाचं पीठ लावून तिला आंघोळ. तिची ओवाळणी. तिला खायला चांगलंचुंगलं. तिच्या पाया पडणं. कारण ती गाउली. अवघ्यांची माउली. ती जनली, अन् तिनं ढवळा गोऱ्हा दिला. खाऊ घातला पिऊ घातला. धट्टमुट्ट झाला. शेतात खपायच्या कामाला आला. त्याच्यासाठी गाणं—

आवतकऱ्या दादा –
नको मारू रे बइलाला –
नको मारू रे बइलाला –
पाठीच्या भावाला !

असं त्या पाठीच्या भावाच्या आईचं कौतुक झालं, तों भादवा उगवला. पुनव आली. आकाश निखरू लागलं. पोरंटोरं रानात हिंडली. कड्यांवर चढली. त्यांनी रानची भाजी गोळा केली. भारंगीची. कुर्डूची. तरोट्याची. अशी कशा-कशाची. या सणापर्यंत भाजीला थोरांनी तोंड लावायचं नव्हतं.

घरोघरी भाजी रांधली. अगोदर पितरांच्या नावानं उलीशी झोपड्यांच्या छपरांवर ठेवली. मग गाउलीला खाऊ घातली. मग अवघ्यांनी खाल्ली.

सकाळीं भुत्यानं अंगण चोपलं. त्याचं शेंबडं पोर म्हणालं,

"काय करीतो र बा ?"

"दिसत नही का ? अंगण चोपीतो–"

"कशासाठी ?"

"नाचासाठी–"

सांजावलं. आकाश लख्ख मोकळं होतं. पावसकाळ्याचे दोन तीन महिने काही चांदिण्याला खाली उतरता आलं नाही. झाडाझुडपांना भेटता आलं नाही. फुलांचे मुके घेता आले नाहीत. ढगांनी वरच्या वर अडवलं. आता मात्र ते बाजूला सरले. वाट मोकळी झाली. मग कौतुकभरलं चांदिणं खाली उतरलं. त्यानं काळीला घट्ट मिठी मारली.

रानभरच्या भाताचे वास. त्यात हे असलं जिव्हारी भिडणारं चांदिणं. भुत्याच्या अंगणात चाळाचा ढीग पडला, अन् भराभरा तरणे ठाकर गोळा होऊ लागले. पायी चाळ गुंतवू लागले. त्यांनी विचारलं,

"ढोलिया नही आला अजून ?"

"नही–"

"बायलीला ! जात का नही बलवायला ?"

चार पोरं धावली. तवर तगड्या पोटऱ्यांच्या भवताली चाळ बांधले गेले. ठाकर भुईवर पावलं दणादणा आपटून चाळ नीट बसवू लागले.

पोरं धापा टाकीत परतली.

"काय झाला रे ?"
"भगत झोपडीत नही !"
कातावून भुत्यानं पुसलं,
"ग्येला कुठं ?"
"डोंगुरावर !"
हतबुद्ध होऊन भुत्या म्हणाला,
"कवा गेला ?"
"सांज पडल्यावर—चांदवा उगवता उगवता—"
"येकलाच ?"
"येकलाच कशानी ? चिंधी गेली संगं संगं !"

नाग्याची बोटं ढोलावर नाचायला सळसळत होती. पण चिंधी म्हणाली,
"येडा—निखळ येडा !"
उसळून नाग्यानं म्हटलं,
"जव्हातव्हा येडा का म्हनीती मला ?"
"हायेस म्हून म्हनीत्ये ! आर, वाडीनं तुला येगळा काढला का ?"
"हा हा !"
"तरी ढोल बडवाया नाचतो ?"
गोंधळून नाग्या म्हणाला,
"मंग काय करूं ?"
तिनं त्याचं बकुट धरलं, अन् त्याला डोंगुराच्या वाटेनं काढलं.
ती दोघं बुधल्याजवळ पोचली, तेव्हा चांदवा कासराभर वर चढला होता.
वाटेत अजून पाणी वाहात होतं. खेकडे तरतरत होते. खडक झरत होते. शेवाळले होते. उजव्या हाताला आकाशाशी भिडलेला बुधला उभा होता. त्यावरून पाणी झिरपत होतं. चांदिणं त्यावर उतरत होतं. रुपेरी दिसत होतं. महादेवाच्या जटेतून गंगा खाली उतरती आहे. ते बारकेबारके झरपे बुधलाभर पसरले होते. महादेवाच्या नाकावरून, गालांवरून, ओठांवरून खाली उतरत

होते. पोळी कड्याच्या पोटाशी होती. ती ओली होत नव्हती. त्यांच्यावरून वाहून झरपे खाली उडी घेत होते. खाली पसरलेल्या दगडाळ काटवणात वरचं हे वाहतं पाणी ठिपकत होतं. कुठं थेंबथेंब. कुठं सुतासारखी धार. कुठं तीहून अधिक मोठी. कुठं चांगला मनगटाएवढा पन्हळ.

ती महादेवासमोर पोचली, तेव्हा त्यांना वाटलं, महादेव ध्यान धरून बसला आहे! हाल्त नाही की बोल्त नाही. सास सुद्धा टाकीत नाही. डोळे गच्च मिटलेले आहेत. पापण्या लोंबल्या आहेत. मुद्रा निचळ आहे. नुसती वरून गंगा खाली उतरती आहे! चांदीचं पाणी वरून लोटती आहे.

दोघांचीही मनं भक्तीनं ओली झाली. हात बांधून ती गप्प उभी राहिली. आपल्याकडे कुठं टाळमृदुंगांचं भजन वाजत होतं. त्याचा धुमित्कार इथवर येत होता. वाऱ्याबरोबर. वरून चांदणं. हा असा भजनाचा स्वर. असा चहू अंगांनी गहिवर दाटला होता.

पोळी आपापल्या जागी गप्प होती. माश्या हलत नव्हत्या की उडत नव्हत्या. जणू त्यांनाही कळलं होतं, की देव समाधीत बसला आहे. त्याचं ध्यान गोंगाटानं भंगेल. मग तो डोळा उघडील. भुवई उचलील. तेव्हा आपण आपलं गडचीप असावं ते बरं.

एक क्षणभर नाग्याच्या मनी मोठ्या वेगानं असं धक्का देऊन गेलं, की असो देवीमाशी आपल्या पोळ्यात. चावल्या माश्या तर चावल्या. आता त्याला काय करायचं? कुठवर डूख धरून बसायचं? फुटला डोळा तर फुटला. होता म्हणून फुटला. नसताच तर काय केलं असतं?

धावत जावं. ढोल उचलावा. तिकडे नाचिये आपली वाट पाहात असतील. खूप वाजवावं. हे इतक्या दिवसांचं साठलं आहे. ते सगळं वाजवून टाकावं. टोचलेलं बोचलेलं. सगळे झुलतील. हात खाली मोकळे सोडतील. वाकून नाचतील. वाजवणं ऐकून त्यांच्या अंगावर काटावळ थरथरून येईल. आपण लहान जीव. हे एवढं केलं, तरी पुरे.

तो त्याच्या खांद्यावर चिंधीनं हात ठेवला. तो बोटांनी दाबीत नाग्यानं पुसलं,

"काय झाला?"

"या चान्दाचा कसा?"

"कसा?"

" यवढ्या आराशीतून उठून चालला जातो. "

उसासून नाग्यानं म्हटलं,

" त्याला गेला पायजे. त्याचा काम केला पायजे. लोभ धरता उपेगाचा नही. "

" खरा ? "

" खरा ! "

चिंधी त्याचा हात धरून ओढू लागली. अवघडून नाग्यानं पुसलं,

" कुठं ? "

" आपल्याला आपला काम केला पायजे. बरा-वाईट. भांडन झाला. गुंता पडला. तो मोडवला पायजे. "

एखाद्या शहाण्यावानी बोलली चिंधी. नाग्यान मान डोलनीत म्हटलं,

" बरुबर ! "

" त्वां बुधला चहूं अंगांनी पघितला ? "

" हा हा ! "

" कुनीकून सोपा ? "

" चल ! "

लेण्यांपासून पन्नास हात उगवतीकडे गेलं, की एक उंबराचं झाड. कड्याला अगदी खेटून उभं. वाट सोडून ती दोघं आडवणात शिरली, अन् उंबराखाली जाऊन उभी राहिली. नाग्या म्हणाला,

" हितून येंगता यील. "

क्षणभर चिंधीन कडा न्याहाळला. मग एकदम नाग्याचा बाव्हटा धरून म्हणाली,

" चलतो का ? "

आश्चर्यानं नाग्या बोलला,

" आत्ता ? "

" आज भादव्याची रात. असा चादना. जाऊ चल ! "

" तू पर येती ? "

" अरे मी नाग्या ठाकराची चिंधी ठाकरीन. जितं माजा नांग्या, तितं मी ! "

नाग्यानं चिंधीचे दोन्ही दण्ड धरले, अन् तिच्याकडे पाहिलं. ती एकदम

त्याला बिलगली. तिच्या पाठीवर थोपटीत नाग्या बोलला,

"द्येवाच्या पाया पडा!"

मग दोघानी मिळून कड्यावर मस्तक टेकवलं. नाग्या हात जोडून म्हणाला,

"म्हादेवा, तुजी लेकरं. तुझ्या अंगावर चडनार. हातपाय लागला, तर मापी दे. हा तुजाच सांगना पुरा करताय्!"

त्यानं पुन्हा एकदा कोयती चापसली. फलाटणं नीट कमरेच्या मागच्या भागावर बसवलं, अन् कड्याला हात घातला. शेजारी उंबराचं झाड. एक पाय कड्यावर. दुसरा उंबरावर. नीट तोल सावरून. अंग पेलून. पाऊल कड्यावर पक्कं रोवून. त्याच्या मागोमाग कड्याला चिपकत चिंधी. एखाद्या घोरपडीसारखी.

अगदी वरच्या फांदीपर्यंत उंबरानं नाग्याची साथ केली. पुढं कड्याला थोडं पोट आलं होतं. उंबराची फांदी लांब जात होती. तेव्हा मग फांदी सोडून खडकाचे कंगोरे धरीत ती दोघं त्या पोटावरून वानरासारखी चढत उभ्या खडकाशी जाऊन पोचली.

लख्ख चांदणं होतं. सगळं स्पष्ट दिसत होतं. क्वचित कुठं खडक शेवाळला होता. पाय घसरत होता. पण कंगोऱ्यात रोवलेल्या बोटांवर शरीर तोलून ती पुढं सरत होती.

महादेवाचं नाक डाव्या बाजूला होतं. पोळीही तिथंच. अस्तित्वात नसलेल्या कानाकडून ही दोघं चढत होती. ऐन चढा कडा आल्यावर नाग्या थांबला. मागं वळून बोलला,

"येती, का थाबती इथं?"

"का बा थाबन्?"

"मंग मी पुढा होतो. वर गेल्यावर माजी वाट हेरीत ये."

कड्यात गवतं उगवलेली होती. त्याची मुळं खोलवर गेली होती. वर थबकलेल्या पाण्याच्या भारानं ती खाली लवली होती. एकेका पात्यावरून एकेक थेंब खाली झरत होता.

नाग्यानं कड्याचा उंचावा हेरला. दहा बारा हात कडा नीट सरळ होता भिंतीसारखा. गवताच्या बुंधाड्यापलीकडे हाती धरायला काहीच नव्हतं. त्या बुंधाड्यांवर पाय देऊन कड्याशी छाती पोट एक करीत वर चढावं लागणार होतं. गवताची झुंबाडी धरून.

नाग्यान पुन्हा एकदा डोंगराला नमस्कार केला. अन् वरच झुंबाड धरून कड्याशी लपकत वर सरकला. चिंधी म्हणाली,

" हलू ! पडशील ! "

ती त्याच्या भरदार पोटऱ्याकडे बघू लागली. सगळा भार त्याच्यावर पडत होता. शीर न शीर वर उठत होती. शिकारीवर टप धरताना एखाद वाघरू जमिनीशी एक होऊन जाव, तसा नाग्या कड्याशी एकजीव झाला होता.

एका बुधाड्यावर दोन्ही पावल टेकून तो वर आसरा शोधू लागला. एक हात एका झुबाड्याच्या आधारान गुतलेला. त्यान गवताचा एक झुबा धरून ओढून पाहिला, तो सगळच कतराट कड्यापासून सुटून खाली आल, अन् ते खाली उभ्या असलेल्या चिंधीच्या डुईवर पडल. ती हादरून म्हणाली,

" काय रे झाला ? "

" काय नाय ! "

" हल रे बाला ! नहीं तर तू खाली उतर. मी चढती आदुगर. "

नाग्याला हसू आल. चिंधीन बाला म्हटल म्हणून. त्यान आणखी थोडं गवत उपटून ते चिंधीच्या अगावर टाकलन. ते झाडीत तीही हसून म्हणाली,

" तू माझ्यापून नाना नहीं का ? बाला म्हनाली त काय झाला ? "

नाग्यान उत्तर दिल नाही त्याला एकट्याला चढायच असत, तर तो सर-सर सरड्यासारखा एव्हापर्यंत वर पोचला असता. पण त्याच्या मागोमाग चिंधी वर यायची होती. त्यान पुन्हा वर हात घातला एक मजबूत झुबाड मिळाल. त्याला झोंबून पुन्हा वर. मग एक बारीकशी खोबण घावली. तिच्या आधारान पुन्हा वर. पुन्हा वर. पुन्हा वर.

वरती पाण्याच्या वाहावान थोड खोलगट केल होत त्यातून पाणी तर वाहात होतच, पण धरण्यासाठी खबदाडी भरपूर होत्या. त्या खबदाडीमधे येंगून नाग्या वर जाऊन बसला, अन मग खाली वाकून पाहात म्हणाला,

" येती का ? "

" तू वर बसला का ? "

" हा हा ! "

" मंग येऊ का ? "

" हा हा ! "

" सोपा हाये का ? "

" हाये त का झाला ! "

नाग्यानं पावलं टेकवली होती, तिथं पावलं रोवीत चिंधी तरतर वर चढून गेली. नाग्यानं तिला हात दिला. त्याच्या अंगावर सगळा भार टाकून ती म्हणाली,

" छातीत धडधडला ! "

" धडधडला का ? आजून तर निम्म्याच्या वर हाये. इथंच बसती का ? "

चिंधीनं नाग्याला मिठी मारली. त्याच्या कानात कुजबुजली,

" इथं कुठं सोडतो रे मधांत ? मी भियाची नही का ? "

हा एवढा चढलेला उंचावा आल्यावर बाकी तसं फारसं अवघड नव्हतं. एका ठिकाणी तर भली थोरली खोबण होती. अन् तीत धोंडे कोमळून पडलेले होते. सगळं ओलं होतं. पाणीच झरत होतं.

या दगडाला धरून पलीकडल्या दगडात. त्याच्या आधारान आणखी वर. ती दोघं एक टेप चढून गेली. मग त्यांना थोडा मुरमाट भाग लागला. त्यात सुबक गवत होतं. मधूनच सोनकीची रोपटी. सोनकीची फुलं डोळे विस्तारून टकाटका पाहात होती. कधी नव्हत ती ही दोन माणसं इथं कुठं आली ?

चिंधी खाली वाकून फुलं तोडू गेली. नाग्यानं तिचा हात धरला.

" का र ? "

" फुलं तोडू नही. "

" का ? "

" रात नही का ?

ती दोघं त्या कड्याच्या अर्ध्या भागात उभी राहिली, अन् तिथून खाली पाहू लागली. जशी घरट्यात बसलेली दोन पाखरं. मन भरून येऊन नाग्यानं पुसलं,

" मजा का ? '

दाटलेल्या स्वरात चिंधी म्हणाली,

" लई मज्जा ! "

पुन्हा नाग्या पुढं झाला. या पाळीला चढणीत चवेणीची दोन रोपं होती. दोन्हीमधून भली फताडी पानं चहू अंगांना पसरली होती. एका चवेणीतून

केळफळाचा धुमारा बाहेर धावला होता. चवेर्णीच्या बुंधावर पाय देत नाग्या अन् चिंधी पुढं चालली. पान कडाकडा मोडली.

चारपाच हात उंचावर काडेसाबरीचं रोप उगवलं होतं. त्या तशा बंगाल्या कड्यातही ते जीव धरून फुटल होतं. वाढत होतं. बुंध्याला हात घालीत नाग्या वर सरला. म्हणाला,

" साभाळून. काटा लागल. "

खालचा कडा कळकळीत होता. भला टणक. जो जो वरच टोक जवळ येऊ लागलं, तो तो खडक भुसभुशीत झाला. पाय सरू लागले. दगड खाली ढळू लागले. पार खाली पोचत, खालच्या टणक खडकावर आपटून आवाज देऊ लागले. चिंधी थोडी मागं थाबली. नाग्यान वळून विचारल,

" काय झाला ? "

" दगूड ! "

" दगुडाचा काय ? "

" पायावर पडला—"

" फुटला का बोट ? "

" नही. "

" थोडा राहिला—"

" चल. "

टेप अगदी हाताशी आलं. नाग्यान एकदा वळून खाली पाहिल. केवढा कडा आपण चढून आलो ते त्याच्या ध्यानी आल. तशा त्या चादण्या रात्री. त्याचं मन अभिमानान भरून आल. चिंधी त्याच्याजवळ पोचून म्हणाली,

" काय पघतो ? "

" काही नही—"

मुरमाटीवर घसरत वर चढताच कड्याच्या खोबणीत पसरलेली एक मुळी नाग्याच्या हाती आली. चागली अंगठ्याएवढी जाड. तिला हात देऊन नाग्या जोर करून वर झेपावला. आता तो माथ्यावर पोचला. तिथं गुडघे टेकून खाली वाकन त्यान चिधीला हात देऊन वर घेतल.

लिंगोबाच्या माथ्याला लागलेला तो माणसाचा पहिला पाय. आतापर्यंत कुणीही देवाच्या डोक्यावर चढलं नव्हतं. वर आली, अन् चिंधीनं नाग्याच्या

छातीत तोंड लपवलंन्. ती हुंदकू लागली. नाग्यानं विचारलं,

"काय झाला ?"

चिंधीन नुसती मान हलवली.

तिला थोपटीत नाग्या भवताली पाहू लागला. खाल्ती सोंडेवर बसलेली ठाकरवाडी. डोंगुराचा दुसरा फाटा लांबपर्यंत धावलेला. पुढल्या डोंगुराला मिळालेला. त्याच्या लवणात भाताची शेतं. डोंगुराच्या पोटाशी असलेली घनदाट झाडी. आस्वलीच्या केसासारखी. हे सगळ चादण्याखाली निच्चळ मनान नहात बसलेलं.

नाग्या उंच उभा राहून हे पाहात होता. देवाच्या डोक्यावर. त्यान अतर्क्य कल होतन्. कढा चढण ही फारशी फुशारकी नव्हे. डोंगुरावर चढता उतरता ठाकूर जल्मत होते. मरत होते. पण दुसरा अलबत्या गलबत्या डोंगूर चढण वेगळ. महादेवाचा डोंगूर चढणं वेगळ.

असा नाग्या देवाच्या डुईवर उभा होता. चिंधीला घेऊन. मग त्यान एक कलन्. गुडघे टेकीत खाली बसला. त्याच पाहून चिंधीही बसली. त्यान डोकं खाली टेकलन्. बऱ्याच वेळान ते उचलून तो म्हणाला,

"आरे देवा ! मी येडा ! आपला ठाकरवाडीचा ढोलीया. हा तू दावलास तो केला. आप्राद झाला आसल तर मापी दे."

मग पुन्हा त्यान डोक टेकलन. चिधीनही.

वर तेरडा अन् सोनकी, याचच राज्य ! तांबडा गुलाबी तेरडा. पिवळी धम्मक सोनकी.

रान केवढं ? असेल दोनतीन चवाळी. पण तेवढ्या त्या रानात फुलाचा नुसता कल्लोळ होता. क्वचित कुठ एखादं काडेसाबरीच रोपटं. त्याच्या भवताली चारसहा लहानमोठे धोंडे. त्या धोंड्यामधून अन् भवताली हिरवं कचं गवत. गवतामधून डोकी वर काढणारी तेरड्याची रोपी. खालपासून वरपर्यंत फुलांनी केवळ बहरलेली. लांबसडक पानं. त्याच्या देठाशी पेलेदार फुलाचा मांड. त्या पेल्यामधून मधले केसर बाहेर डोकावत असलेले. आपल सगळं सामर्थ्य

रंगावाटे उधळून देणारा तेरडा.

अन् सोनकी. एवढंसं रोप. त्याच्या मस्तकी पावलीएवढी चक्राकार पिवळी धम्मक फुलं. प्रत्येक पाकळी सुटी सुटी. फूल जणू धरतीच तेज पिऊन आलं आहे. गंध त्याच्याजवळ नाही. आहे रूप. ल्हानुसा आकार. पण तेवढ्या त्या आकारावाटे रूपाचा महिमा खुला होतोय.

या दोन फुलझाडाची वर जणू बाग आहे. काटा नावाला मुद्धा नाही. खुशाल वाटेल तिकडे हिंडा.

नाग्या अन् चिंधी चहू दिशांना धावली. हातात हात गुंतवून. उगवतीकडे. मावळतीकडे. दक्षिणेकडे. उत्तरेकडे. खाली पसरलेलं कोकण त्यानी वेड्यासारखं पाहिलं. चादवा ऐन मध्यावर आला होता. आकाशात क्वचित कुठं ढग होते. अजिबात नाही अस नाही. पण चांदिणं ओतायला त्याचा अडथळा होत नव्हता.

किती पाहू ! किती पाहू ! चिंधीला खूळ लागल. ती टेपाच्या मध्यभागी गवतावर बसली. कोवळं लूस गवत. जशी आईची माडी. भरताराची कूस. मग ती यथेच्छ लोळली. नाग्याला म्हणाली,

"ढोलिया, ये !"

नाग्या कंबरेवर हात देऊन पाहात होता. तिची हाक ऐकताच तो हसू लागला.

"का र हासतो ?"

"उगा !"

"ये नां !"

तो जाऊन तिच्या डोक्याशी बसला. तिच्या कपाळावर त्यान गाल ठेवला. डोळे मिटून घेतले. चिंधीनं आपले सैल हात त्याच्या भवती टाकले. आजपर्यंत कुणी गेलं नव्हतं, अशा ठिकाणी ती दोन वेडी लेकर त्या चादण्या रात्री अशी धुंद होऊन गेली. एका आगळ्या क्षणी वासना हारपते. तो क्षण आला. नुसते एकमेकाचे श्वास जाणवताहेत. तेही चादण्यात नाहात अंगावर कोसळताहेत. ते भोगावेत. यापरतं काही बोलू नये. हालू नये ती दोन अडाणी माणसं. पण त्या रुपेरी क्षणी अशी खुळावून गेली.

पण थोड्या वेळान आपण वर कशासाठी आलो, याचा आठव झाला. मग नाग्या उठला.

"का र ?"

"झाड पघतो–"

"हा हा !"

मग अंग झडझडून चिंधी उठली. ती महादेवाच्या नाकाडाच्या दिशेनं चालली. खाली थोडकं लवण, अन् त्या लवणात नांदुर्कींचं एक ठेंगणं झाड. टाटुरलेलं. पण मुळ्या चांगल्या मजबूत. खडकात पांगलेल्या. त्या मुळ्यांना धरून नाग्या अगदी कडेला झुकला.

"सांभाल रे राजा !"

"हा हा !"

"काय दिसतो ?"

"देवाचा नाकाड."

"मला बगू दे–"

"तू येऊ नको. लई खोल."

नाग्यानं अंदाज घेतला. इथं या मुळीला दोर बांधता येईल. तो काही नेमका देवीमाशीच्या पोळ्यावर उतरायचा नाही. जरा बाजूला जाईल. पण मग काही-तरी करता येईल. इथून खाली कडा सरळ तुटलेला आहे. दोर धरून उतरणं काही फारसं अवघड नाही.

पण नाग्याचं न ऐकता चिंधी तिथवर आली. मुळी धरून ती पालथी झोपली. तिथून खालचं मैदान पाहू लागली. उभा कडा. शेजारचा नाकाडाचा भाग. इथून उतरणारा दोर महादेवाच्या डोळ्यावरून खाली लोंबला असता.

"का र ढोलिया !"

"का झाला ?"

"पोला त दूर राहातो !"

"हा हा !"

"मंग ?"

नाग्या विचार करीत राहिला. चिंधीच म्हणाली,

"मी दुसरा टोक धरून ठेवीन. खाली. तिरका–"

"पर पोला तुज्या अंगावर कोसलला तर ?"

"मी खाली झाडाच्या बुडखाला गुतवीन टोक. मी दूर न्हाई.न"

" सगळा अंग झाकून ? "

" हा हा– "

नाग्यानं चिंधीला हात देऊन मागं ओढलं. मग पुन्हा एकदा त्यानं मुळीचा पक्कावा अजमावून पाहिला.

" पक्की आहे र ! हलियाची नही. "

काही वेळ तो कमरेवर हाताचे मुटके ठेवून उभा राहिला. मग म्हणाला,

" चला– "

चिंधीनं नाखुशीनं म्हटलं,

" रात हितंच काढू रे ढोलिया ! "

" आयशी कालजी करील, का कुटं गेली ही ढोगां ! "

ती दोघं आल्या वाटेनं खाली उतरली. सावकाश. तोल सांभाळीत.

मध माश्या खरोखरी कधी झोपतान का ? त्या वेळी पोळं हाकललं पाहिजे. नाही तर पुन्हा दुसरा डोळाही जायचा. ठाकर गडी पोळी काढतात खरी, पण ती खाली जाळ करून. अंगाला घोंगडं बांधून. इथं महादेवाच्या हनुवटीखाली जाळ करायची सोय नाही. तेव्हा रात्रीच पोळ्यावर घाव घातले पाहिजेत. एरवी कामं साधायचं नाही.

नाग्या सारखा त्या लहानुश्शा पोळ्याभवती घोटाळू लागला. पिंपुर्णीच्या खोडावर पाय टेकून बसावं. बेचक्यात असलेल्या पोळ्याजवळ. तिथून ते पोळं निरखावं. माश्यांचं उडणं कसं. पंख साफ करणं कसं. तरातरा बाहेर जाणं कसं. भराभरा लगबगीनं परतणं कसं.

पहिल्या पहिल्यांदा माश्या त्याला बिचकल्या. पण मग तो त्यांच्या सवयीचा झाला. अधिक जवळ सरकू लागला. तिथून ते लहान लहान जीव निरखू लागला. एकदा तर त्यानं पोळ्याच्या अगदी शेजारी आपला हात ठेवला. माश्या उडून आल्या, अन् त्याच्या हातावरच बसल्या.

पहिल्या क्षणी त्याचं अंग थिरकलं. पण मग माश्या हातावर बसणंही त्याला मोठं गमतीचं वाटलं. कसं मऊपणं बसता येतं यांना !

बरोबरच आहे. धसमुसळ्यासारख्या बसतील, तर फुलं मोडतील. पोळ्यातली मेणाची छिद्रं विस्कटतील. त्यांनी अलगत बसलं पाहिजे. कळलं न कळलं असं. ज्यावर बसलं त्याला गुदगुल्या करीत. त्याच्या अंगावर हलका काटा थरारवीत.

त्यानं अलगत हात उचलला. अगदी जवळ धरला. दोन चार देखण्या माश्या मनगटावर बसल्या होत्या. सुबक पंख. पळसाच्या पानासारखे. पण थोडके लांबट. महा बळकट पाय. त्याना खालच्या अंगाला अगदी बारीक, सुक्षम लव. पुढं डोकं, अन् त्याच्याखाली सोंड. मागच्या बाजूला काटा.

एका डोळ्यान निरखून निरखून नाग्या पाहू लागला. काटा दिसताक्षणी तोच चमकला. याच जातीच्या काट्यान आपला डोळा फोडला! हेच ते धारदार हत्यार!

पण मग त्याला वाटलं की एवढा महागामोलाचा मध गोळा करतात या माश्या. त्याच्याजवळ एखादं असं धारदार हत्यार जर नसलं, तर कुणीही सोम्यागोम्या येईल. अलबत्या गलबत्या येईल. मध लुंगवून जाईल. हत्यार पाहिजेच.

तरी नाग्या काही त्याचा मध काढायला गेला नव्हता. त्यांना ढकाही लावला नव्हता त्यान. मग का त्यानी डासे काढले? का त्याचा डोळा फोडला? छे! हे आगाऊपण त्या देवीमाशीचंच! कुणी विचारणारं पुसणारं नाही. तिला वाटलं की आपण महादेवाच्या हनवटीखाली बसलो आहोत. उंच गगनात. कुण्या ठाकराच्या पोहोचेपासून दूर. आता वाटेल तसं आक्रीत करायला हरकत नाही. द्यावे शिपाई नाग्यावर सोडून. फोडोत त्याचा डोळा. भोकं पाडोत त्याच्या अंगाला. आपण मजेत पोळ्यात बसून गंमत पाहावी!

पण तिला माहीत नाही. तो नाग्या आहे. म्हणजे नागोबा! एरवी कुणाच्या वाटेस जायचा नाही. सुतावानी सरळ. भोळासांब. पण चिडला म्हणजे डासा काढल्याशिवाय राहणार नाही म्हणावं. त्याच्याशी बनली, म्हणजे आग-वणव्याशी बनली! आता हा पार की तो पार!

सांजावलं. माश्या पोळ्याकडे परतू लागल्या. हळू हळू पोळं शांत होऊ लागलं. हालचाल बंद झाली. ते देखणे जीव सगळे पोळ्याला ओथंबून बसले. जणू ती एखादी दगडाची कातलेली पोळी आहे. चिपचाप. नाग्यानं आपलं बोट पोळ्यावर अलगत टेकवलं. तिथल्या तिथं माश्या हलल्या. पुन्हा त्या गप्प

झाल्या.

एक लांब उसासा सोडून नाग्या परतला.

आयशीचे सांधे दुखत होते. रात्रभर ती कण्हत होती.

चिंधी उठली. आयशीजवळ गेली. अंधारातच तिच्या अंगावर हात ठेवून म्हणाली,

"सासबाय, काय गे झाला ?"

"अंग हाडका दुखताहेत !"

"चंऽ काय वायशी ?"

"नुको ! उंद्या निर्गुंडीचा पाला आनून सांद्यावर बांदू."

चिंधी पुन्हा येऊन कुडाआडच्या हंतरुणावर निजली. नाग्या जागाच होता. अंथरुण चापसून चिंधी बोलली,

"खाली भुईवर गेलास. अलिकडे सर."

तिच्याकडे वळून तिच्या अंगावर हात टाकीत नाग्या बोलला,

"चिंधी !"

"वो !"

"माजा म्हनना असा–"

"कसा ?"

आपल्या हातावर बसलेल्या त्या लहान लहान सुबक माश्यांचं वानवानून सांगून नाग्या म्हणाला,

"तर माजा म्हनना असा–"

"अरे सांग तो कसा ?"

अशी त्या कष्टाळू जिवांची बरीच वकिली करून नाग्या म्हणाला,

"माजी खोडी काहाडली, म्हंजी मी लई वाईट माणूस—खरा ?"

"खरा."

"पर माश्यांनीं खाल्ला त खाल्ला–"

"का ?"

"खाल्ला त खाल्ला–"

"बोल!"

"जाऊं द्ये, म्हाऊं द्ये ध्येवमाशी तिच्या पोल्यांत!"

चिंधी त्याला चापट मारीत म्हणाली,

"आरे चण्डाला, मंग इकते दिवस कायबाय क्येला–"

"जाऊं द्ये–"

"ध्येवानी सांगितला तो–"

"ध्येवाची मापी मांगू–का वा चुकला आमचा!"

चिंधी उठून बसली. नाग्यानं म्हटलं,

"का गे?"

"सोड."

"कुटं जाती?"

"कुटं बी! इत्ता माश्यांनीं फोडला, तरी ज्याचा मन जलत नही, त्याच्या जवल कशाला राहायचा?"

"चिंधी!"

"सोड."

"जाऊं नको."

"सोड!"

"माजा काम मी पुरा करीन. मंग तर झाला?"

चिधी पुन्हा झोपली, अन् तिनं नाग्याला वेटाळून घेतलं.

वणावणा हिंडत त्यांनी अवघं जंगल धुंडून काढलं. लिंगोबाच्या रानातली सगळी झाडं शोधली. शेवटी पलीकडल्या बाजूला डोंगुराच्या उतरतीला आपट्याच्या रानात ती शिरली. एका खोलवणात नाग्या शिरायला लागला, तेव्हा त्याला भेटला फॉरेस्टगार्ड. नाग्यानं त्याला रामराम घातला. नाग्या सुबक ढोल वाजवतो, हे गार्डाला माहीत होतं. चिंधीची कथाही त्याला ठावी होती. त्यानं डोळे मिचकावून विचारलं,

" कुठं निघाली जोडी ? "

" येरींच—"

" येरींच कसं ? कांहीं काम असेल ? हिरडी शोधायची असेल ढोलासाठीं ! हिरडीबिरडी तोडलीस तर याद राख हां ! सरळ नेऊन ठाण्यावर बसवीन ! "

" नाय बा ! हिरडी नकू मला ! "

" मग काय ? मोहोळ ? ही गांधीलमाशी आहेच कीं मागं ! "

चिंधीनं झणकाऱ्यानं मान हलवीत म्हटलं,

" आपल्या न्हवऱ्यामांगं जायाला कुनाचा भेव नही ! "

गार्ड हसून म्हणाला,

" सावकाश जा माझ्या मावश्ये ! अरे पण काय शोधतांहांत सांगितलं नाहींत—"

" कुटं येल बील—"

" कसला ? "

" कोंभाळा ! "

" कोंभाळ्याचा वेल ? तुमच्या रानांत काय काळ गेला ? "

" हायेत—पर उलीउली ! "

" मग या दरडीनं असाच खालीं जा. एक बेहेडा आहे, त्याच्यावर हवा तितका लांब कोंभाळा आहे. जाळीच झाली आहे. पण बेहेड्याला हात लावूं नको हो ! "

कुऱ्हाड खांद्यावर टाकीत गार्ड पुढं निघाला. चिंधी थुंकून म्हणाली,

" त्याला खाल्ला तरसानी ! "

" कुनाला ? "

" गारडमुड्याला ! मला गांधीलमाशी बोलतो ! डंख मारीन तवा उमगल् ! "

" जाऊं दे—"

धोंडी ओलांडीत दोघं घळीत खाली चालली. झाडांचे बुंधे ओलांडीत. पांढुरके अन् भुरके. घळीत ओढा वाहात होता. कधी या कडेला. कधी त्या कडेला.

एकदम नाग्या थांबला.

" तो बग ! "

बेहेड्याचं झाड उंच पोहोचलं होतं, अन् त्यावरून कोंभाळ्याचे दोर खाली

लोंबत होते. हवे तितके. पावसाच्या धारा उतराव्यात तसे. असं मांडीसारखं मूळ. त्याला फुटलेले फांदोरे बेहेड्याला धरून उंच पोहोचले होते. काही पोराच्या मनगटाएवढाले. काही त्याहून बारीक.

पाहताक्षणी दोघं हरिखली. नाग्या भराभरा बेहेड्यावर चढला. गुंता सोडवून त्यानं पाहिजे तितके धागे कापले. शेजारच्या झाडावळीत गुंतून ते सैल पडले. चिंधीन तळाशी बेचक्यातून तोड केली, अन् सगळे फाद्यामधून ओढून खाली काढले.

"उतर ! बख्खळ झाला !"

"दुपेडी दोर करायाचा."

"हा हा !"

"कमी पडल्—"

"नही. बख्खळ हुईल."

नाग्या उतरला. फुटलेले फांदोरे कापून त्यान ओढ्याच्या पात्रात सगळे तुकडे एकाशेजारी एक मांडले. वीस पावलं टाकली. पुन्हा वीस. पुन्हा वीस. मग आणखी दहा. आणखी दोन वीसा हात भरतील, इतकी वेलाची काडकी उरली.

घाम पुशीत नाग्या बोलला,

"बख्खळ झाली !"

"हा हा !"

"आता काय करायाचा ?"

"आजपून चौथ्या दिशीं मधरातीं चाद उगवल्. त्या रातीं काम करायचा. चार दिसांत येल वाळून कडक नही व्हायाचा ?"

"गुंडाळी करून वढ्याच्या पान्यांत ठिऊन देऊ !"

"हा हा !"

वेलांची दोन गुंडाळी करून दोघानी उचलली. बुधल्याखालच्या लवणात पाणी वाहात होतं. तिथं एका ठिकाणी खडकाची भकाळ होती. चांगली मांडीभर खोल. त्या भकाळीत त्यानी ती दोन्ही गुंडाळी नीट ठेवून दिली. वर चांगले भले मोठाले धोंडे. मग घाम टिपीत ती दोघं परतली.

वाकाच्या दोरीचे दोन भले भक्कम गुंडाळे घेऊन चिंधी पेठेतून परतली. येशीनं तिला पुसलं,

"यवढा दोर काय करायचा ?"

हसून चिंधी म्हणाली,

"काम हाये—"

संध्याकाळी भडमाळीचा भात रांधला. हुलगे उकडून त्यांचं काढलं पाणी. मुकटाची वाटली चटणी. आयशी हा थाट पाहून म्हणाली,

"आज हाये तरी काय ?"

लाजून चिंधीनं म्हटलं,

"काही नही—"

नाग्यानं थाळी भात भरून संपवला. आंचवून तोंड पुशीत त्यानं ढोल खाली काढला, तर चिंधी बोल्ली,

"हितं वाजवतो, तर आज भुत्याच्या अंगनांत का जात नही ?"

नाग्यानं अचंब्यानं तिच्याकडे पाहिलं. त्याच्या तर फार दिवसांपासून मनी होतं. पण तो चिंधीमुळं संकोचत होता. उत्साहानं त्यानं विचारलं,

"जाऊं ?"

"जा ना !"

ढोल उचलून नाग्या भुत्याच्या अंगणात पोचला, अन् मधोमध बसून त्यानं ढोलावर कांडकं टाकलं.

सगळे ठाकूर चमित्कारले. बायली ! गंमतच आहे ! ढोलिया माणसात आला. आपला चांदीसोन्याचा हंडा पुन्हा आपल्याला मिळाला. याची तर कल्पनाही केली नव्हती. हजारदा नाकदुऱ्या काढाव्या लागतील. विनवावं लागेल. कान धरावे लागतील. तंव्हा कुठं ढोलियानं मनावर घेतलं तर घेईल.

तो घेईल मनावर. पण बाईल ? छे रे बाबा ! बायकू कसली, विस्तू आहे तो ! सारखी त्याच्याभवती असती. जरा त्याला इकडे तिकडे फिरकू देत नाही. एखादं पाखरू पाळावं, तसा तिनं नाना भगत पाळता घेतला आहे. माकड-

वाल्याच्या माकडासारखी नाग्याची दोरी आपली चिंधीच्या हातात! ती सांगेल ते करतो. ती सांगेल तिकडे जातो. तिच्या नंदरेच्या धाकात आहे गडी. महा बाजिंदी बाई आहे.

बरोबरच आहे म्हणा तिचं! खपती कशी? डहाण्या वाघिणीसारखी काम करीत असते. चार गड्यांचं काम एकटी करते. वाडीहून आगळा हिचा भारा. वाडीहून आगळी हिची मोळी. चालती दणादणा, तेव्हा झोपडी गदागदा हालतात. कामाला नळनीळजांबुवंत आहे!

असं सगळं खपणं ढोलियासाठी. त्यासाठी जीव टाकती. पित्या पोरावानी जपत असती त्याला. तेव्हा त्यानं तिचं आइकावं, हे अगदी बरुबर आहे. बायलील ढोलियाचं भाग्य लई उच्च! म्हणून अशी बायकू मिळाली. नाहीतर आमची घणघणी वानरं—

बांग–बाग–बांग—

हातचा जेवता घास तिथंच टाकून अवघे पळत सुटले. पाहिलं तर ढोलिया अंधारात बुडून गेला आहे. ढोलावर डोकं ठेवलं आहेन. ढोलातून घुमित्कार काढतो आहे. एकेक ठोका ऐकणाराची छाती थरथरवीत पलीकडे जातो आहे.

कुणी नाग्याशी काही बोललं नाही. मुकाट्यानं भुत्यानं बहालावरचं चाळांचं ओझं काढलं. टण्णदिशी आणून अंगणात माडलं. एकेकानं एकेक चाळ सोडून घेतला. पायांभवती गुंडाळला. मग नाचिये ढोलियाभवती फिरू लागले. एक आला. दोन आले. चार आले. दहा–बारा–पंधरा.

बायाबापड्याही धावल्या. सगळ्या भवताली गोळा झाल्या. कुणीतरी जाळ केला. कुणी फाटी आणून जाळात टाकली. आपल्या नाच्यांचं नाचणं बघू लागल्या. आपल्या ढोलियाचं वाजवणं.

चिंधी मुकाट्यानं आली. निंबाच्या झाडाला टेकून उभी राहिली. एक पाय उचलून. भुत्यानं कानावर हात ठेवला, अन् नवं गाणं काढलं. खणखणीत सुरात—

महादेवा महादेवा तुला लाख नमिस्कार
तुज्या अंगनीं वाजना असा चालूं दे चालूं दे—

सगळ्यांनी कडवी म्हटली. एकदा हुई केलं. अन् मग नाग्याचं वाजवणं गत बदलून वाजू लागलं. महादेव बुधल्यावर कोरला आहे. लई उच्च! गंगनाएवढा. वाजवणंही उंच. ठाय लयीत. दमदार गतीनं. दोन्ही पुडं सारखी वाजताहेत.

गंभीर आवाज करताहेत. जसा नगारा घुमतो आहे. जसं मृदंगाचं धुमपुड नाद देतं आहे.

त्या महादेवाला नमस्कार! सगळ्यांचे हात जोडले गेले. ढोलावर धुमाळी वाजू लागली. जसे वारकरी नाचताहेत. धिंगधांग धिडांग. ज्ञानुब्बा तुकाराम! भक्तीनं गदगदून, वाढता वाढता लय वाढली. जसा महादेवाचा डमरू वाजतोय. पाय भुईवर ठरेना. एका घुंगराच्या आवाजात दुसऱ्याचा आवाज मिसळतोय. छुन्नक छुन्नक. छिछिछुन छुन्नक. होता होता नाचिये दिसेनात. जणू ढोलिया-भवती भिंत उभी आहे. फिरती भिंत. भोवंडी यावी, तशी गत झाली. शेवटी एकदोन गडी चक्कर येऊन कोसळले. तेव्हा नाग्या थांबला.

थांबला, अन् पुन्हा मंद गतीनं ढोल घुमू लागला. आवेशानं भुत्या दुसरं गाणं सांगू लागला—

असा नाग्याचा वाजना जसं गडगडं आभाळ
जसा ढगाचा कडाका प्रिथमीच्या पाठीवर

सगळे नाचिये खूष झाले. ते ओरडून म्हणाले,

"पुन्ना सांग रे पुन्ना सांग!"

भुत्यानं गाणं पुन्हा म्हटलंन्. सगळ्यांनी कल्लोळ करीत त्याची झील ओढली. हुईई केलं. मग ढोलातून एकदम मेघाचा गडगडाट फुटला. अंगं थरकापवून टाकणारा. नाचिये एकदम खाली झुकू लागले. झटके देऊन कबंधं वर उचलू लागले. बायकांना धास्ती वाटली, की कंबरा मोडणार आता. म्हाताऱ्या तर ओरडल्या सुद्धा—

"आर, डुकराची चरबी नही कुठं! जरा हळू नाचा!"

पण ते कुणीच मानलं नाही. ढोलातून ढगाचा कडाका निघू लागला. नाचिये जणू जीव खाऊन धरतीवर आसूड मारताहेत. डोकी हलता हलता शेंड्या सुटल्या. केस पार डोळ्यांवर आदळू लागले. अंगात आलेल्या बाया नाचतात. केस पिंजारून. तसं ते दिसू लागलं. हसता हसता बघ्यांची पुरेवाट झाली. एकच कल्लोळ झाला. पण नाग्याची ढोलावरची पकड सुटली नाही.

भुत्यानं पुन्हा गाणं म्हटलं—

अस्सा कारवीचा वास उभ्यां रानांत घुम्मतो
अशी लोंबटी भाताची जशी बायकू नाजुक

नाचिये गडी आरडले,

" जशी बायकू नाजुक–"

ढोलावर नाजुक काम सुरू झालं. जशी लावणी म्हटली जाती आहे—जशी ढोलकी वाजती आहे. असं बारीक नकसकाम. रानचमेलीच्या पांढऱ्याशुभ्र फुलांसारखं. अहा ! अहा !

जणू नाचिये हे पुरुष नाहीतच. त्या आहेत सुवासिनी. हाती परड्या घेऊन फुलं आणायला चाललेल्या. असं मुरकणं. असं थिरकणं. असं माना वेळावणं. पुन्हा गत बदलून. मग दोघादोघांचं फुगडी खेळणं. मग नखुल्याबाई नखुल्या. चंदनाच्या टिकूल्या !

अवघ्या बाया फुसुफुसू हसू लागल्या. एकमेकींना एकमेकींच्या अंगावर ढकलू लागल्या. एक जाऊन नाचिया गड्यांमधे कोसळली. लगेच एकानं तिचे दोन्ही हात धरले. बसफुगडी सुरू झाली. मग म्हाताऱ्यांनी सगळ्या तरण्यांना नाचात लोटलं. फडकी म्हाताऱ्यांजवळ देत, अन् नही नही म्हणत सगळ्या नाचात शिरल्या. सुरेख गोफ विणला जाऊ लागला. रंगारंगाचा. पिळापिळाचा—

अरे ! हे काय ? हे असं काय वाजवणं ?

एकदम ढोलाची गत बदलली. नाग्याचं डोकं ढोलावर टेकलेलं. सगळं अंग जणू दगडी पुतळी. हात तेवढे पुडांवर चालताहेत. बारकावा सुरू झाला नाचिये थक्क होऊन उभे राहिले.

ढोलातून जणू कधी काळीचं दुःख वाहातंय. महादेवाच्या डोळ्यातली आसवं. उदास झालेलं गगन. वेळूच्या बेटांमधून धूधू वाहणारा वारा. वावटळीच्या लोटानं वर उचललेली पानावळ हलके हलके खाली गळत्ये आहे. अलगत धरतीवर उतरत्ये आहे. या बाळंतिणीच्या वेणा. तिच्या मुखातून मंदपणं बाहेर पडणारी कळ. ओहोटू लागलेल्या नदीचं हे थांबत थांबत–कण्हत कण्हत वाहणं. पावसाविना वाळणाऱ्या पिकांचे हे मंदमंद सास !

हे असं का वाजवतो आहे नाग्या ? त्याच्या मनीचं दुःख असं बाहेर येऊन भुईवर पसरतंय का ? सगळे गप्प झाले. मुकाट्यानं ऐकू लागले.

अंधारात निंबाला टेकून उभ्या असलेल्या चिंधीच्या डोळ्यातून आसवं झरू लागली.

सकाळी गवत कापायला जायचं होतं. तसं बोलणं झालं होतं. पण चिंधीचं निघायचं चिन्ह दिसेना.

आयशीनं विचारलं,

"का गे बाय ?"

"सासबाय, अज तू जा येकली—"

"तू !"

चिंधी गप्प राहिली. कुडाला धरून उभी. आयशीनं तिच्याकडे पाहिलन्. नाग्या झोपलेलाच होता. आयशी म्हणाली,

"बरा. नको येऊं. नांग्याला जेऊंखाऊं घाल."

बाहेरच्या निमणीवर विळा घासून आयशी बाहेर पडली. चिंधीनं वळून चुलीत फाटी घातली, अन् भगुल्यात पाणी तावत ठेवलं.

मग तिनं अंबाडा सोडला. केस विंचरून स्वच्छ केले. पाणी तावल्यावर डोक्यावरून न्हायली. पुन्हा पाणी तावत ठेवलं, अन् मातीच्या दोन्ही घागरी घेऊन पाणी आणायला झऱ्यावर गेली. दोघी पोरी झऱ्यावर पाणी भरीत होत्या. त्यांनी विचारलं,

"गवत कापाया नही गेली, चिंधी ?"

"नही. तुजी आयशी ?"

"माज्या दोगी आयशी गेल्या. अन् बा बी गेला."

"बरा."

झऱ्यातून बाहेर वाहणारं पाणी खोलवणात जमा होत होतं. तिथून पुढं ते ओढ्याला मिळत होतं. त्या खोलवणात तीन चार बारक्या मासळ्या इकडे तिकडे करीत होत्या. त्या दिसताच पोरींनी पाणी भरणं तसंच टाकून तिकडे धाव घेतली. त्या चिंगळ्याना ओंजळीत धरण्यासाठी त्या धडपडू लागल्या.

एरवीचा दिवस असता, तर चिंधीनं त्या पोरींना मदत केली असती. नव्हे, आपणच त्या मासळ्या धरून पोरींच्या हवाली केल्या असत्या. पण आज तिची तंद्रा वेगळी लागली होती. घागरी डोक्यावर घेत ती म्हणाली,

" ए, नुको ! "

अचंब्यानं पोरी तिच्याकडे पाहात म्हणाल्या,

" काय नुको गे, चिंधी ? "

" चिंगल्या धरू नुको ! "

" का ? "

" नुको ! "

एवढं बोलली, अन् चिंधी वाडीकडे चालू लागली. पोरींना कळेना. काय करावं ? चिंगळ्या पकडाव्यात की सोडून द्याव्यात ? सोडून देणं तर जिवावर येत होतं. त्या इवल्या इवल्या रुपेरी मावश्या घाबरून जाऊन सारख्या इकडे तिकडे धावत होत्या. त्यांना पकडण्यात मजा होती. त्यांच्या पाठी लागण्यात त्याहून मजा होती. पण ही आखाडसासू रागावली तर ? पोरी तशाच पाण्यात उभ्या राहिल्या.

चिंधी चढ चढू लागली अन् क्षणभर थबकून तिनं वळून मागं बघिलंतन्. तिची नजर जाताच पोरी पट्टदिशी पाण्याबाहेर पडल्या. मग चिंधी भराभरा चढावरून् झोपडीकडे वळली.

घागरी उतरून पाणाड्यावर ठेवून दिल्या. पाणी तावलं का ते बघितलंन. अजून थोडा वेळ होता. तिनं काल बाजाराहून खोबरं आणलं होतंन्, ते माळ्यावर ठेवलं होतंन्. ते खाली काढून ती पाट्यावर वाटू लागली. चांगलं बारीक वाटल्यावर तो गोळा आलिमीनच्या वाटीत ठेवून दिलान्.

मग उठून नाग्याजवळ जाऊन उभी राहिली. गुडघे पोटाशी घेऊन, दोन्ही हात त्यात मुडपून तो निसूर झोपला होता. तोंडावर माश्या चावल्याचे वण. डोळे मिटले असल्यामुळं एक फुटल्याचं काही जाणवत नव्हतं. त्याची शांत, एखाद्या पित्या पोरासारखी अपाप मुद्रा पाहिलीन्. टचकन् चिंधीच्या डोळ्यातून पाणी आलं. ते पुशीत ती खाली बसली. तिनं आपले थंड ओठ नाग्याच्या कपाळावर टेकवले.

नाग्या एखाद्या मुलासारखा ऊं ऊं करू लागला. मग त्याच्या कानाजवळ तोंड नेऊन चिंधी कुजबुजली,

" ढोलिया, आज काम करायाचा ना ? "

एकदम डोळे उघडून नाग्या टकटका बघू लागला. त्यानं आपले हात

चिंधीच्या गळ्यामोवती टाकले. त्याला उचलून पोटाशी धरीत ती पुन्ह कुजबुजली,

" आंगुली करायची नही ! खोबरा वाटून ठिवला—"

मग नाग्या झडझडून उठला. लंगोटी नीट पसरीत तो बाहेरसाठी निघाला. चिंधी म्हणाली,

" उशीर नुको करू ! "

" नही. "

थोडक्या वेळात नाग्या परतला. तवर चिंधीनं पाणी काढलं होतंन्. त्याला आतल्याच दगडावर बसवून तिनं त्याच्या डुईला वाटलेलं खोबरं लावलंन्. मग उरलेला चोथा हातांना अन् छातीपाठीला चोळला.

नाग्यानं भुड्डभुड्ड आंघोळ केली. चिंधी म्हणाली,

" उनाडाया बाहेर जाऊं नुको. मी भात रांधील्ये—"

" डोंगुरावर जाऊन येतो—"

" काह्याला ? "

" येतो—"

" लवकर ये—"

" हा हा ! "

फलाटणं कंबरेला गुंतवीत नाग्या तडातड बाहेर पडला. लवण उतरून तो चढाला लागला. मधली पांध ओलांडीत बुधल्याखालून तो महादेवासमोर जाऊन उभा राहिला.

महादेवाचं तरुणपण पिकूं लागलं होतं. त्याच्या अंगावरल्या गवताचं हिरवेपण किंचित पिवळ्या रंगाकडे झुकूं लागलं होतं. पण त्याचं ध्यान काही भंगलं नव्हतं. डोळे तसेच झाकले होते. ते किलकिले सुद्धा झालेले नव्हते.

नाग्यानं त्याच्यासमोर डोकं टेकलंन्. त्या भल्या प्रचंड बुधल्यासमोर. त्या उलीश्या नाग्यानं. मग तो उठून हात जोडून उभा राहिला.

महादेवा रे ! डोंगरच्या राजा ! आज नाग्या तुझ्या डुईवर चढणार आहे. आपला सबूद पाळणार आहे. आपली तेख निभवणार आहे. तुझ्या नाकाजवळून खाली उतरणार आहे. अन् ती मधली आग्यामाश्याची पोळी —त्यांत निसुग मनानं बसलेली ती देवीमाशी—

अशी नारळाएवढी. चांदीसोन्याची. असा तिचा झळाळ. अशी तिची अवघ्या राहाळावर सत्ता—

तिला तुझ्या आसऱ्यापासून हाकून काढणार नाग्या! मग काय होईल ते जाईल. ही थड की ती थड!

देवीमाशी झाली म्हणून काय झालं! लई उतली मातली. तिलाही कळायला पाहिजे. आपण माशी आहोत, तर नाग्याही मनुक्ष आहे. त्यालाही दऱ्या-डोंगरात फिरायचा हक्क आहे. झाडावर चढायचा. कोरडी फाटी काढायचा. त्याच्यावर शिपाई सोडता उपयोगाचे नाहीत. विनाच्या कारणी आघाऊपणा केला, तर नाग्याही लई खराब मनुक्ष आहे!

तर महादेवा रे! आज नाग्या ते आक्रीत करणार. तूच वाट दावलीस. त्या वाटेनं तो जाणार. त्याला साभाळ. त्याचा उचलला पण पुरा होऊ दे. तेवढं झाल्यावर मग काही का हुईना! पोळी खाली कोसळल्यावर मग नाग्या भीत नाही. एक डोळा फुटलाच आहे. दुसराही फुटेल. त्याची काळजी नाही. सूड पुरा झाला पाहिजे! महादेवा रे, उलीश्या नाग्याच्या सबुदाची लाज तुला!

असा बराच वेळ उभा राहिला. मग नाग्या देवासमोरून हलला. त्याच्या हनुवटीखाली चालला. जाळी पार करीत. दगडांमधून. चढाव चढत. थेट खाली पोचल्यावर तो मान उचलून बघू लागला. त्याच्या नेमकं डोईवर ती दोनतीन भली प्रचड पोळी होती. माश्या त्यातून बाहेर निघत होत्या. काही त्याच्यावर बसत होत्या. पुन्हा उठत होत्या. असं कायबाय चाललं होतं त्याचं.

आता थोडा वेळ उरला. मजा करून घ्या. पिऊन घ्या. खाऊन घ्या. संध्याकाळ उलटल्यावर तुम्हाला हे ठिकाण सोडून दुसरीकडे जावं लागणार आहे. नाग्याची कोयती कोसळणार आहे तुमच्या पोळ्यावर. तुम्हाला वाटत असेल, की देवीमाशीच्या छत्राखाली आहोत आपण. आपल्याला कोण काय करणार? तो ऊतमान आज जिरणार आहे! देवीमाशीला सांगा—आज रात्री म्हणावं!

असं माश्यांना बजावून झाल्यावर नाग्या हनुवटीखालून दूर सरला. चढाव उतरून तो थोडा लांब गेला. महादेवाच्या भुवईवर त्याची शेंडी. मग नाक. नाकाखाली हनुवटी. शेंडीला वेल बाधायचा. पण मग दोरावर उतरून पोळ्यां-पर्यंत हात कसा पोचायचा? की वेलाचं खालचं टोक तिरकं खालच्या झुडपांन।

बांधून ठेवावं ?

करू काहीतरी. चिंधीच्या विचारानं. घरी गेलं पाहिजे. तिनं भात रांधून ठेवला असेल. उशीर झाला, तर डोळे काढायची !

सांजावलं. दिवसभर रिती असलेली ठाकरवाडी पुन्हा भरली. झोपडीझोपडीतून चुली धगधगू लागल्या. भाताची भगुली रटारट शिजू लागली. भाजल्या बोंबलाचे वास. मुकटाच्या चटणीचे. कुळथाच्या कळणाचे.

लांब सूर काढून कुठल्या कुठल्या गोष्टी सांगणं. खाल्लेल्या दारूच्या नशेत छातीवर हात मारणं. मिशांवर ताव देणं. फारेष्ट गार्डाला राहाळातून हाकून लावायच्या गोष्टी करणं. त्याचं तंगडं तोडून टाकायच्या आणभाका घेणं. तसाच हातासरसा कोळश्याच्या भट्टीचा कंत्राटदार. त्याची दाढीमिशी बोडून, हातातलं कडं हिसकावून घ्यायच्या शपथा करणं. रागेजणं. लोभावणं. असा वाडीभर काल्वा. बकऱ्यांचं बेंबाटणं. गलीकडल्या झोपडीतली एक पोटुशी होती. आज दोन दिवस ती विवळत होती. पोर काही होत नव्हतं. कुणी म्हणत होतं, कीं पोर आडवं आलं आहे. पेठेला दवाखान्यात नेलं पाहिजे. ती बोंबल्या मारीत होती, की पेठेला नेऊ नका मला. डागदर माझं पोट फाडील.

आयशी थकून आली होती. घासभर अन्न गिळलंन्, अन् गप्पा संपवून ती येऊन लवंडली. गर्रदिशी तिला झोपही लागली.

चिंधीनं गुपचुप दोरीचा बिंडा काढला. कोयती कमरेला लावली. नाग्या बाहेर बसला होता. हळू आवाजात ती म्हणाली,

“ नाग्या ! ”

नाग्या तटकन् उठला. आत आला. आकडीवर टांगलेलं कोयतीसकट फलाटणं कमरेला अडकवलंन्. दांडीवरची घोंगडी खांद्यावर टाकलीन्. तो बाहेर पाऊल घालणार, तों चिंधीनं त्याला मिठी मारलीन, अन् त्याच्या छातीत तोंड लपवलंन्. त्याला जाणवलं की तिचे डोळे वाहताहेत. तो आश्चर्यानं म्हणाला,

“ काय झाला ? ”

पटदिशी त्याच्या तोंडावर हात ठेवीत चिंधी कुजबुजली,

" नही नही – चला ! "

चिंधीनं घोंगता उचलला, अन् ती दोघं बाहेर पडली.

वाट सुंभाच्या घरावरून होती. सुंभा खोकत दाराशी बसला होता. त्यानं या दोघांना पाहून विचारलं,

" भगता, मोहोळ काढाया का रे ? "

चिंधीनं आगाऊपणं उत्तर दिलं,

" हा हा ! "

" चांगली मध निंघाली तर मला द्या हां उलीशी ! "

" दिऊं ! "

ती दोघं भराभरा ल्वणात उतरली अन् चोंढ्यांच्या बांधावरून चालू लागली. वाट पायाखालची होती. अडखळायचं काही कारण नव्हतं. तरी चिंधीची पावलं मधूनच थबकत होती. चढाव चढताना ती नाग्याच्या खांद्यावर हात देत होती. नाग्या मात्र तडातडा चालला होता.

टेपाड चढून ती हिरडीउंबराच्या पांधीत पोचली. एकदम नाग्याचा हात चिंधीनं धरून ओढला. तो मागं वळून बोलला.

" काय ? "

" नही, ये बसू. "

एका खडकावर चिंधी टेकली. अंवघडून नाग्या तिच्या शेजारी बसला, तेव्हा त्याची कोयती खडकावर वाजली. चपापून चिंधी बोलली,

" अरे हालू ! "

कोयती नीट सावरीत उतावीळपणं नाग्यानं म्हटलं,

" कशाला बसली ? "

चिंधीनं उत्तर दिलं नाही. नुसती नाग्याच्या मांडीवर डोकं टेकून पडून राहिली. तिच्या पाठीवर हात ठेवीत नाग्या म्हणाला,

" उशीर नही व्हायाचा का ? "

" हूं दे ! "

" अरे चांदवा निंगल...माश्या जागतील– "

" जागूं दे ! "

" आसा कसा ? "

"न्हाऊं दे-"

अचंब्यानं नाग्यानं पुसलं,

"पोळा काढायचा नही?"

चिंधी कुजबुजली,

"नुको काढूं!"

आश्चर्यानं थक्क होऊन नाग्या तिच्या पाठीवरचा हात न उचलता तसाच बसून राहिला.

आकाश स्वच्छ होतं. अगदी क्वचित् कुठं ढगाचा एखादादुसरा तुकडा तरंगत होता. सगळ्या चांदण्या जिथल्या तिथं बसून लकाकत होत्या. त्यांच्या प्रकाशात झावळं झावळं दिसत होतं. चांगला उजेड नव्हता खरा. पण रानच्या ठाकराला वाट चालताना सहज दिसावं, इतकं लख्ख तर होतंच होतं.

झाडांवर बसलेले रानकिडे सूर धरून बोलत होते. खाली कुठं तरी चोंढ्यात कोल्हं ओरडत होतं. लिंगोबाचा डोंगूर समोर आकाशाशी भिडला होता, अन् त्याच्या तळाशी ही दोन लहान माणसं अवघडून बसली होती.

शहाण्यांनी खुळ्यात काढलं असतं, असं अकृत्य कराया ती निघाली होती. डोंगुराच्या अवघडपणाशी झुंझायला. त्याच्या शंभर हात उंचीच्या कड्याशी. त्याच्या सरळसोट उभाराशी. त्याशी लटकलेल्या आग्या माश्यांच्या पोळ्याशी. अशा अचिन्त्याशी. असंभवाशी.

त्या अवघ्या राहाळात हे त्यांचं कृत्य अतर्क्य होतं. लिंगोबाचा डोंगूर हा देवाचा डोंगूर. त्यावर चढायचं कुणी स्वप्नसुद्धा पाहिलं नव्हतं; तर कल्पना कुठली करणार! असं जगावेगळं करायला ती दोघं चालली होती, अन् आता चिंधीनं आयत्या वेळी खोडा घातला होता. मग एवढं सगळं कशाला केलं?

नाग्या अगदी कातावून गेला, तो चिंधीनं उठून त्याच्या गळ्यात हात घातले. तोंड त्याच्या कानाशी नेलं. म्हणाली,

"माज्या ढोलिया, तुला ठावा नही-"

"काय?"

चिंधी फुसफुसली,

"आरे-झरा बंद झाला-"

आश्चर्यानं नाग्यानं पुसलं,

" कुंचा झरा ? "

" आंगावरला–"

" कुनाच्या ? "

कसा खुळा'हा ढोलिया ! चिंधी खुदकन हसली. नाग्याच्या पाठीत चापट घालीत ती म्हणाली,

" तुज्या ! "

" माज्या ? माज्या अंगावर कुंचा झरा ? "

पुन्हा त्याच्या गळ्यात झोंबून चिंधीनं त्याच्या मानेत तोंड लपवलं, अन् मानेचा चावा काढला. कळवळून नाग्या बोलला,

" चावती काय ? "

" मंग ? माश्या चावल्या तव्हा ? "

हे तर खरं आहे. त्या चावल्या तेव्हा त्यांना काय केलं ? नाग्या गोंधळला. चिंधी म्हणाली,

" बोल ना ! "

" खरा. "

" डोंबल खरा तुजा ! काय पर समजत नही. निसता ढोल वाजवता येतो. "

कातावून नाग्यानं विचारलं,

" काय झाला तो सपस्ट सांगत का नही ? "

" मेल्या, पोटात बाला हाये–"

" कुनाच्या ? "

" माज्या ! हितं ! "

तिनं नाग्याचा हात धरला. नेसण्यामधून आत शिरवून आपल्या ओटी-पोटाला लावला.

आता कुठं नाग्याच्या डोक्यात उजाडलं. खरं ? अगदी खरं ? तो आनंदानं नुसता मोहोरला. त्याच्या अंगावरचा थरकाटा चिंधीलासुद्धा जाणवला. तो तिचे बाव्हटे धरून म्हणाला,

" खरा ? "

" खरा रे खरा ! "

" म्हंजी चिमना भगत ? "

" हा हा ! "

" माजा ढोलिया ? "

" हा हा ! तुजा नि माजा ढोलिया ! "

नाग्या उठला. त्यानं हात आकाशात उंचावले. मग खाली केले. चिंधीचं मुका घेतला. एकदा. दोनदा. दहदा. मग म्हणाला,

" चाल ! "

चिंधी त्याच्याकडे बघत राहिली. तिचा हात धरून ओढीत नाग्या बोल्ला— भरल्या आवाजात,

" आता उशीर नोको करू ! "

ती दोघं उबराखाली पोचली, तेव्हा नाग्या म्हणाला,

" तूं थांब. मी येल आनीतों ! "

तो अंधारात दिसेनासा झाला, अन् थोड्याच वेळात झावळा झावळा उगवला. डोक्यावर भलं प्रचण्ड वेलाचं वेटोळं. कमरेएवढं उंच.

चिंधी बोलली,

" आगे बया ! एकल्यानी आनीला ! "

" लई भारी नही— "

वेटोळं खाली ठेवून ती दोघं दोन धोंड्यावर अमोरसमोर बसली. घोंगत्यावर चिंधी. घोंगडीवर नाग्या. अंधुक चांदण्यात. बोलून त्यांनी बेत पक्का केला.

नाग्यानं वाकाच्या दोरीचं वेटोळं कमरेला बांधून एकल्यानं वर चढायचं. माथ्यावर पुढं आलेली एक कपार आहे. तिच्यावर नीट तोल सांभाळीत उभं राहून त्यानं दोरी खाली सोडायची. ती अशी इथं कुठंतरी येईल.

पण न आली तर ?

" दगूड बांधू. "

" हा हा ! "

चांगला मोठा दगूड टोकाला बांधून नाग्यानं तो खाली सोडायचा. म्हणजे तो कुठं अडकणार नाही. अडकला तरी पुन्हा हलवला कीं वजनानं तो खाली

येईल. चिंधीचे डोळे चांगले लख्ख आहेत. तिला अंधारातसुद्धा दिसतं. इथून आपल्याच्या पेठेतल्या बत्त्या तिला दिसतात. तेव्हा दगूड दिसायला काहीच अडचण नाही. शिवाय नाग्या वरून हाक देईल. त्याच्या अंदाजानं तिनं तो हेरायचा.

"माज्या टकुऱ्यांत नको टाकू बरा का!"

"नही नही!"

तरी दगडही काळा, अंधारही काळा. त्यापेक्षा असं करावं. दगूड बांधल्यावर त्याच्या भवताली नाग्याच्या डुईचा पंचा गुंडाळावा. म्हणजे मग सगळीं बिलामत टळली.

"खरा?"

"खरा!"

मग त्या टोकाला चिंधी वेलाच्या दोराचं टोक बांधील.

"पक्का बांध हा का?"

"हा हा!"

"नही तर मंधीच सुटल—"

"नही–"

मग नाग्या अलगात वर ओढून घेईल. चिंधी हळू हळू वेल सोडीत जाईल. एकेक वेढा उलगडत जाईल. या एवढ्या उंचीपेक्षा पाच दहा हात जास्त आहे वेलाचा दोर. बरोबर अंदाज केला आहे. शेवटी काही थोडकं शेपूट उरेलच. पण मधे कुठं अडायचा नाही ना शेंडा? मग आली का पीडा! तशी काही मोठी पीडा नाही. पुन्हा दोरी खाली सोडली, अन् थोडं अलीकडे पलीकडे झालं, की गुंतावा मोकळा होईल.

मग दोरी कमरेला बांधून, कडेकडेनं तोल सांभाळीत नाग्यानं नांदुर्कीच्या झाडाकडे जाऊ लागायचं.

"येकला नुको जाऊ!" धास्तावून चिंधी म्हणाली.

"मंग?"

"मला येऊं दे!"

"नही–"

"का नही?"

" मंग खालचा येल बांधियाचा काम कोन करील ? "

" हा हा ! "

तिथं पोचल्यावर नाग्यानं वेलाच्या टोकाचे चार सहा वेढे अगोदर मुळीला द्यायचे. मग ते टोक नादुर्कीच्या खोडाभवती गुंतवायचं. वेल ओला आहे. सहज वळेल. भ्यायचं काही कारण नाही. खोडाला बैलगाठ दिली की झालं.

मग वेल वरून खालपर्यंत लोंबू लागेल. शंभर हात ! महादेवाच्या शेंडीपासून पार मांडीपर्यंत. त्याचं वरचं टोक आकाशात असेल. खालचं टोक धरतीवर. वाय रे ! केवढं उंच ! अन् या एवढ्या उंच दोरावर नाग्या लटकणार ! तारेवर लटकणाऱ्या कोळ्यासारखा !

उलीसा नाग्या ! वाडीचा लहानगा ढोलिया. येडा खुळा. अजून त्याला तर काहीसुद्धा कळत नाही. भोळा संभ्यामहादेव आहे. मघा चिंधीनं झरा आटल्याचं सांगितलं, तर आपला विचारायला लागला की कोणता झरा ?

चिंधीनं डोळे मिटून घेतले. तिचं अंग वीज उतरल्यासारखं थरारलं. एकदम ती उठली, अन् नाग्याच्या गळ्यात पडून रडू लागली,

" नही जाय चा ! "

आश्चर्यानं नाग्या आरडला,

" काय ? "

" जायाचा नही ! "

" का ? "

" इतका उच चढाचा नही. येलावर लटकायचा नही. पोला तोडाचा नही–"

खुळी आहे झाल चिंधी ! अरे पोळी काढणं ठाकराना काय अनोळखी का आहे ? चिंचाआब्यावरची पोळी काढता काढता ठाकर म्हातारे झाले. पोळ्याची भीती नाही. उरली वेलावर लटकायची बात. तो तर देवानंच दिलेला कौल आहे. तेव्हा घाबरायचं नाही. हादरायचं नाही. देवावर विश्वास ठेवायचा. एकदा दोर बांधून झाला, की मग अर्ध्या घटकेचं काम आहे.

नाग्या सरसर खाली लोंबेल. नीट वेलाला धरून तो उतरेल. घोगडी गुंडाळून. पोळी आतल्या बाजूला आहेत. चिंधीनं वेल खाली ओढून बांधायचा. नीट तिरका. पोळी हाताशी येतील असा. मग आपण कड्याच्या पोटाशी लपून असायचं. तिथून लांब. सगळं अंग घोंगत्यानं नीट वेढून घ्यायचं. कुठलाही भाग

उघडा राहू द्यायचा नाही.

मग सपासपा नाग्याची कोयती चालेल. लपालपा पोळ्यांचे लपके खाली कोसळतील. देवी माशीचा लपायचा ठाव मोडेल. ती कातावून उडून जाईल. आकाशात दिसेनाशी होईल. तेवढं चिंधीनं निरखायच, म्हणजे झालं.

नाग्याचं देवीमाशीशी भाडण पडल. तिचा ठाव कापून काढला की बाकी पोळी राहीनात का ! आपलं काही त्याच्याशी वादंग नाही.

नाग्यान चिंधीला थोपटलं, तिचे डोळे पुसले. पुन्हा तिचा मुका घेतला. मग त्यानं घोगडी कंबरेभोवती बांधली. तिच्यावर मागच्या बाजूला वाकाच्या दोरीचा गुंडाळा.

तो पुन्हा एकदा महादेवाच्या पाया पडला. चिंधीनही डोक टेकलन्. त्यानं विचारलंन्,

"जाऊं ?"

चिंधी रडवेल्या स्वरात पुटपुटली,

"जा !"

उंबराच्या झाडाच्या पाया पडून नाग्यान त्याच्यावर पाऊल ठेवलं, अन् तो सरसर कडा चढू लागला.

वाट डोंगुराची होती; तरी एकदा पाहिलेली होती. ओळखीची होती. तीवर पहिल्या पाऊलखुणा नाग्यानंच तर उठवल्या होत्या. अंधार असला म्हणून काय झाल ! काही काळामिट्ट अंधार नाही. झावळ झावळं दिसतं आहे.

एखादा वानर कडा येंगावा तसा अंगाला झोले देत नाग्या बोलबोल म्हणता पहिलं पोट चढून गेला. वरून त्यानं चिंधीकडे वळून पाहिल. ती डोळ्यात प्राण आणून त्याच्याकडे पाहात उभी होती. नाग्यानं पुसल,

"माजी चिंधी, ब्येस ?"

"ब्येस रे ब्येस ! साबाळून !"

मग नाग्या पुन्हा वर झेपावला. कडा चढून जाण त्याच्या हातचा मळ. एखाद्या अबलख घोड्यानं रस्त्यावर डौलानं टापा फेकाव्यात, तसा डोंगुराच्या

छातीवर पावलं रोवीत नाग्या कडा चढून गेला. वरच्या पाण्याच्या झरण्यानं कोरलेला खोलवट भाग. तिथले ते धोंडे. सोनकीची रोपी. चवेणीची झुंबाडं. कांडेसाबरीचं झुडूप. भुसभुशीत भाग. मुरमाटी. वरची मुळी. तिला धरून एका फलांगीत वर. ऐन माथ्यावर !

तिथं नाग्या खाली बसला. गुडघे टेकून. एकदा त्यानं मस्तक टेकलंन्. मग खाली वाकून बोलला.

" चिंधी ! "

अंधारातून साद उमटली—

" काय रे नाग्या ! "

" वर पोचला— "

" पोचला ? देव पावला ! आता ? "

" दोरी सोडीतो ! "

" हा हा ! "

टेपाड पुढं आलं होतं, त्यावर येऊन तो उभा राहिला. कंबरेची दोरी सोडलीन्. टोकाला एक चांगला मोठासा दगड बांधलान्. गच्च वेटोळे देऊन. सुटला न पाहिजे. मग त्याच्यावर डुईचा पंचा. तोही गाठी मारमारून. पुन्हा खाली वाकून तो आरडला,

" चिंधी ! "

" वो रे ! "

" सोडू दगूड ? "

" सोड रे सोड ! "

नाग्या अल्गत, वजन पेलत दोरी खाली सोडतोय्. क्वचित् एखाद्या ठिकाणी ते कंतराट अडखळतं. दोरी सैल वाटू लागते. पुन्हा ती वर उचलून जरा शेजारून सोडायची. एवढं थोरलं गुंडाळं होतं. संपत चाललं. अजून खालून साद कशी नाही ?

आली. हाक आली.

" आला रे आला. आता सोडू नको ! "

मग उरलेलं दोरीचं टोक हाती गच्च धरून नाग्यानं एकदा भवताल न्याहाळला. तिथं निचळ शात होतं. गवताचा, सोनकीचा, तेरड्याचा–असा सगळाच सरमिसळ, किंचित उग्र गंध दरवळत होता. नाग्यानं छाती फुलवीत तो

तिच्यात भरून घेतला. पलीकडलं कांडेसाबरीचं रोपटं एखाद्या दोस्तासारखं तिथं जणू अगोदरच येऊन बसलेलं. तेही नाग्याला जाणवलं. तो खोलवणातला नांदुर्कीच्या झाडाचा शेंडा—

" नांग्या ! "

" वो ! "

" बांदला रे येल. हळू हळू वढून घे. "

नाग्यानं पायाखाली चाचपून पाहिलं. टेपाडावर खडकाची टेंगळं उगवली होती. त्यांच्यात पाय भक्कम रोवले. मग तो दोरी वर ओढू लागला. त्याच्या पलीकडे दोरीचा गुंताडा पडू लागला. शेवटी शेवटी थोडं जड जाऊ लागलं.

फारसं कुठं न अडखळता वेलाचं टोक हाती आलं, तसं नाग्यानं ओरडून म्हटलंन्,

" गे चिंधी ! "

" रे नांग्या ! "

" आला गे आला. खाली न्हायला ? "

" हा हा ! "

" किती ? "

" मस हाये. धावीम हात. "

" मंग मी जाऊ नांदुर्कीकडे ? "

" जा जा ! "

एकदा नाग्यानं विचार केला, की दोरी सोडून टाकावी. पण त्यानं वेलाचं टोक पायाखाली मजबूत धरून दोरीचा गुंनावा गुंडाळला, अन् तो एक्या हाती घेतला. वेल हातून सुटला, तर पुन्हा खाली उतरावं लागू नये. टोक दोन्ही हातात मजबूत धरून तो टेपाच्या कडेकडेनं नांदुर्कीकडे निघाला.

एकदोन ठिकाणी खडकाची डोकी उंचावली होती. त्यावर वेल अडल्या-सारखा वाटला. पण जरा हिसका देताच तो सुटला. मधे एकदा थांबून त्यानं विचारलं,

" गे चिंधी ! "

" काय रे नांग्या ! "

" तू टोक धरला हायेस ना ? "

"हा हा! तू कालजी करू नुको! मी तुज्याबरुबर येती. कड्याच्य पोटापोटानी."

"वाटं हाये ना?"

"हा हा!"

नांदुर्कीशी पोचल्यावर नाग्या पाऊलभर खाली उतरला. मग मात्र त्यानं दोरी सोडून टाकली. वेल ओला होता. हवा तसा वळत होता. त्याचे तीन चार वेढे नांदुर्कीच्या मुळीला देऊन नाग्यानं टोक चांगलं दोन वावा वर काढलं. मुळीला गाठ देऊन मग खोडाभवती बैलफांसा घातला. पाय खोडाला लावून, ओढून ओढून तो पक्का केला. मन शेवटी पुन्हा एक निरगाठ ठेवून दिली. ऐशाभले! कामात खोट राहता उपयोगाची नाही.

खालून हळी आली,

"बांदला का?"

"हा हा!"

"मी खाली येकलीच्या बुंध्याला गुतवला दुसरा टोक. तिरका. आता पोली पघून येऊ का?"

"ये ये."

नाग्या कंबरेवर हात ठेवून उभा राहिला. त्याच्या छातीत थोडं धडधडू लागलं. पण मग त्यानं म्हटलं, की असं येड्यावानी करता उपयोगाचं नाही. हिंमत बांधली पाहिजे. आपल्याला धीर द्यायला कुणी नाही. चिंधी राहिली खाली. त्याची चिंधी—

तिच्या पोटात लहानगा बाला आहे–बसलेला? झोपलेला?

तिनं आपल्याला जा म्हणून म्हटलं आहे. तेव्हा आता धास्तीची गरज नाही—

"नाग्या रे!"

"वो रे चिंधी!"

"पक्का काम झाला!"

"कसा कसा?"

काय बोलत्येय कोण जाणे! चांगलं ऐकू येत नाही.

"चिंधी!"

" वो रे ! "

" मोठ्यानी बोल ! "

" अरे येल तुज्या मंदल्या पोल्यावरून उतरला हाये—"

" पक्का ? "

" हा हा ! "

" किती लांब हाये पोला ? "

" जवल हाये—"

' डोंगुराच्या पोटाशी टोक वढून बांध—"

" बांधीत्ये रे बांधीत्ये—"

" बांधला का सांग. मग तू दूर जा सगला आंग घोंगत्यानी झाकून घ्ये—"

" हा हा ! "

नाग्यानं घोंगडी छाती अन् पोटाभोवती गुंडाळली. चांगली मजबूत. पार मांडीपर्यंत, दोरी कोयतीनं तोडून त्यानं वरून बांधून टाकली. काम पक्कं केलं. घोंगडीवरून फलाटणं नीट गुंडवलं. त्याच्या नेढ्यातून पलीकडली गाठ बाहेर काढून पक्की बसवली. एक ऊठबशी काढली. हात वर फेकून पाहिले. एकदा भरपूर सास घेतला. मग तो सोडला. पुन्हा घेतला—

खोलातून, दरीआडून अंधुक हाक आली,

" नाग्या रे ! "

" वो रे चिंधी ! "

" खडकाला बांदला येलाचा टोक. पक्का—"

" आतल्या बाजूला ? "

" हा हा ! "

" तिरका ? "

" काय म्हन्तो ? मोठ्यानी सांग ! "

दोन्ही हातांची ओंजुळी शंखासारखी तोंडाशी लावीत नाग्या आरडला—

" म्हन्ताय – तिरका का ? "

" हा हा ! "

" उतरू ? "

" देवाचा नाव घे ! "

चिंधी शहाणी बायकू आहे. तिनं बरोबर आठवण केली.

नाग्या पुन्हा गुडघे टेकून खाली बसला. मोठ्या श्रद्धेनं त्यानं देवाला आण घातली—

देवा रे महादेवा, तू दावल्या वाटेनं नाग्या निघाला आहे. या अंधारात. कड्यावरुन खाली उतरतोय तो. खाली काय आहे चगलंसं माहीत नाही. पोळी कुठं आहेत, त्याचीही नीटशी कल्पना नाही. विश्वास केवळ तुझ्यावर आहे—

अन् खाली माझी चिंधी आहे, तिच्या बोलावर! तिनं सांगितलंन् उतर. तेव्हा उतरायचं—

तिच्या पोटात लहानगा बाला आहे—

नाग्याचं अंग शिरशिरलं. एकदा त्यानं ते गदगदा हलवलंन्. मग त्यानं साद दिली,

"माज्ये चिंधी!"

"वो!"

"उतरताय्. तू लांब गेली? घोंगता पांघुरला?"

"हा हा! उतर रे माज्या नांग्या! सांबाळून!" कापऱ्या स्वरात खालून दाद आली.

"हा हा!"

नाग्या उलटा फिरला. त्यानं मुळीला हात घातला, अन् खाली अंतराळात पोचलेल्या वेलावर पायाची बोटं टेकली. अंगठा अन् शेजारचं बोट यांमधे वेल पक्का धरला.

क्षणभरच त्याचं मन हललं. पण विडीचं थोटूक फेकून द्यावं, तसा त्यानं तो अर्धकच्चा विचार मनातून काढून फेकून दिला.

तो वेलाला लोंबू लागला, याच वेळी पूर्वेला अर्धा चांदवा उगवला. नाग्यानं मागं वळून एकदा तो पाहून घेतला. अरे! उशीर झाला. तो वर आला, तर माश्यांना दिसेल. आता लगबग केली पाहिजे!

वानर उतरावा, तसा नाग्या उतरू लागला. सगळा जोर दण्डांवर. वेल कचकचू लागला. पण भ्यायचं कारण नाही. तो दुहेरी आहे. शिवाय गाठी तपासल्या आहेत. कचकतोय ओझ्यामुळं. एक कड्याची खोबण आली पायाशी. तेवढंच बरं झालं. पायाच्या अंगठ्यांना विसावा.

खालच्या अंधाराच्या अथांग सागरात नाग्यानं उडी घेतली होती. एका दुबोटी वेलाच्या भरंवशावर. त्या कुहरात त्यानं सूर मारला होता. प्रचण्ड आकाशात एखादं लहानसं पाखरू झेपावं तसा. एखाद्या गडाच्या तटावरून बारका कोळी धाग्यावरून उतरावा तसा.

खोबणीत दोन्ही पायांचे पंजे टेकून नाग्यानं खाली वाकून पाहिलं. पुन्हा एकदा हाक घातली,

"गो चिंधी!"

"काय रे नांग्या!" आता आवाज स्पष्ट ऐकू आला.

"अगे अर्धा आला!"

"भला रे माझ्या बाला!"

चिंधीन बाला म्हटल्याचं ऐकून नाग्याला पुन्हा एकदा हसू आलं. येडीच्या पोटात एक लहानगा बाला आहे, अन् ही नाग्याला बाला म्हणत्येय्!

"उतरूं?"

"पोळी जवळ आली. सांभाळून!"

पुन्हा नाग्यानं वेलावर पावलं टेकली. पाणी उतरून उतरून कड्याचा हा भाग अगदी गुळगुळीत झाला आहे. वेल कड्याशी अगदी लपकून बसला आहे. बोटं आत शिरत नाहीत. सोलली जाताहेत. पण तेवढं तर होणारच. एवढा गाम चुकवायला नको!

बाप्प-बाप्प-फड्-फड्-फड्—

केवढ्यानं दचकला नाग्या! वेल हातून सुटणारच होता.

पण भियाचं कारण नाही. कड्याच्या खोबणीत पाखराचं घरटं आहे. बहुधा एकटाच नर असावा. तो नाग्याच्या चाहुलीनं उडून गेला. बरं झालं. त्याच्या खोबणीत पाय ठेवून थोडकं विसावता येईल.

नाग्या खाली वाकून पाहू लागला. भवतालीही. बाप रे! ही शेजारी पोळी आहेत लोंबलेली. दहापंधरा हात उतरल्यावर भकळ सुरू होत्ये आहे. तिथंच आहेत ती पोळी. नाग्याच्या अंगाएवढाली. इथून स्पष्ट दिसत नाहीत. पण तिथंच आहेत. त्या पोळ्यातल्या एकामधे आहे देवीमाशी—

एकमद तीच पुढं आली तर? कडाडून डासा काढला तर? दुसराही डोळा फोडला तर? की परत फिरावं?



कुठं ? पुन्हा वर चढून जावं ? माथ्यावर ? अन् खाली ताटकळत असलेली चिंधी काय म्हणेल ? ती नाग्याच्या तोंडावर थुंकेल, अन् पोटातल्या ल्हानग्या बाळाला घेऊन निघून जाईल—

नाग्यानं पुन्हा वेलावर पावलं टेकवली. पिसाटासारखा तो तिरका खाली उतरू लागला. हाताची बोटं फुटली आहेत. पर्वा नाही. पायाच्या अंगठ्याचा टवका निघाला आहे. सावकास निघो !

सरळ कडा संपला. लवण सुरू झालं, अन् काही क्षणात नाग्या त्या प्रचंड पोळ्यांसमोर वेलाला लोंबून थबकला. केवढाली पोळी. एकाला एक चिकटलेली. नाग्याहून अधिक उंच. पण आता उसंत नाही ! होईल ते होवो ! ही थड की ती थड !

त्यानं विजेसारखी कोयती फलाटण्यातून काढली, अन् एका हातानं वेलाला गच्च झोंबून दुसऱ्या हातानं पोळ्यावर तो कोयतीचे घाव घालू लागला.

सगळा आकांत आकांत उडाला. भराभर लरकेच्या लपके खाली कोसळू लागले. माश्या पिसाळून गोंगाट करू लागला. घावांवर घाव. वेलाचा हात तुटायला झाला आहे. त्यावर माश्या डसल्या आहेत. डसोत !

तोंड छातीत लपवून अंगी भूत भरल्यासारखा नाग्या घाव घालतो आहे. म्हणतो आहे—

देवीमाश्ये ! घे ! आणखी घे ! आणखी ! मनुक्ष नाग्याचे हे घाव ! घे !

पार कोयती खडकावर आपटू लागली. सगळी पोळी निःशेष झाली. तेव्हा नाग्या भानावर आला—

अरे ! हे काय ! चिंधी का किंचाळते आहे ?

" अरे माज्या नाग्या रे ! "

विजेच्या गतीनं नाग्या खाली चालला. दोन पुरुष उंचावरून तर त्यानं उडीच टाकली. माश्यांच्या कल्लोळात.

लरके खाली कोसळले खरे, पण तिथून माश्या चहू बाजूस उधळल्या. त्यांना चांदण्यात दिसली चिंधी. वेल हलू लागला तेव्हा सुध हरपून, घोंगता फेकून धावत येऊन वेलाला झोंबलेली. जीव खाऊन वेल ओढून धरलेली. त्यांनी सगळ्यांनी तिच्यावर हल्ला केला. चिडून पिसाळून तोंड फोडून टाकलं.



पण तशाही स्थितीत चिंधीनं वेल सोडला नव्हता. ती डोळे मिटून आकांत करीत होती,

"ये रे माज्या नांग्या लवकर!"

नाग्यानं धावत जाऊन तिला धरलं. बाव्हटं पकडून उचललं. त्याला उगवत्या चांदण्यात दिसलं, की चिंधीच्या तोंडावरून रक्ताचे ओघळ लोटताहेत.

चिंधीला मिठी घालून नांग्या आक्रंदला—

"अगो माज्या चिंध्ये!"

ती त्याच्या छातीत शिरली, अन् शुद्ध हारपण्यापूर्वी मघापासून योजून ठेवलेलं एक खोटं कुजबुजली,

"अरे माज्या नांग्या! तुजा जैत झाला! तू जिकलास! देवीमाशी उडून गेलेली मी पघितली. सवता माज्या डोल्यांनी!"

